दैनिक

# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. १९ मार्च २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये




सोनेरी पहाट उंच गुढीचा थाट
आनंदाची उधळण अन् सुखांची बरसात
नव्या वर्षाची सोनेरी सुरुवात...!

गुढीपाडव्याच्या मन:पूर्वक शुभेच्छा...!

## बारामती पोटनिवडणुकीत पेच वाढणार?

### महाराष्ट्रात निधनानंतर बिनविरोध निवडणुकांची परंपरा नाही : हर्षवर्धन सपकाळ यांचे सूचक विधान

**मुंबई (दै. संध्या)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीवरून राज्यातील राजकारण तापण्याची चिन्हे आहेत. "महाराष्ट्रात दुःखद निधनानंतर निवडणूक बिनविरोध करण्याची कोणतीही परंपरा नाही. अपवादात्मक परिस्थिती वगळता राजकीय भूमिका घेऊनच निवडणुका लढवल्या जातात," असे विधान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. सपकाळ यांच्या या भूमिकेमुळे बारामतीची निवडणूक बिनविरोध होणार की गाजणार, याबाबत आता चर्चांना उधाण आले आहे.

अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या बारामतीत विधानसभा मतदारसंघात 23 एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने तीन दिवसांपूर्वीच या निवडणुकीची घोषणा केली. अजित पवारांच्या दुर्दैवी निधनामुळे ही निवडणूक बिनविरोध होईल असा दावा केला जात होता. तसे सर्वच राजकीय पक्षांनी संकेतही दिले होते. त्यानुसार, राष्ट्रवादी काँग्रेसने येथून अजित पवार यांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विधानसभेवर पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या भूमिकेने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. महाराष्ट्रात दुःखद निधनानंतर बिनविरोध निवडणूक करण्याची कुठलीही परंपरा नाही. अपवादात्मक काही किरकोळ गोष्टी सोडल्या, तर सर्वसाधारणपणे ज्या ज्या ठिकाणी पोटनिवडणुका होतात, त्या ठिकाणी दोन्ही बाजुंनी निवडणूक लढली जाते. नांदेडमध्ये खासदार म्हणून वसंतराव चव्हाण हे निवडून आले होते. त्यांच्या मृत्युनंतर ज्या निवडणुका झाल्या, त्यात भाजपने आपला उमेदवार उतरवला होता. त्यामुळे अशा पद्धतीची परंपरा नाही, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणालेत.



### शरद पवार गटाशी कोणतीही चर्चा नाही

विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने बारामती पोटनिवडणुकीत आपला उमेदवार उभा न करण्याचा निर्णय घेतला आहेत. यावर भाष्य करताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राष्ट्रवादी शरद पवार गटाशी थेट स्वरुपात तशा पद्धतीची चर्चा झालेली नाही. ऐकीव माहितीच्या अनुषंगाने आम्ही त्यांच्याशी चर्चा करणार आहोत. निवडणूक बिनविरोध होण्याला विरोध असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अशापद्धतीची परंपरा नाही. शेवटी राजकीय भूमिका यामध्ये महत्त्वाची आहे. आता राजकारण बरेच पुढे चालले गेलेले आहे. त्यामुळे पक्ष म्हणून काही भूमिका घ्याव्या लागतात.


## श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

'गणपती भवन', २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४७९२२२




**गुढीपाडवा व हिंदू नव-वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**

चैत्र शु. १, प्रतिपदा, शके १९४८, गुरुवार दि. १९ मार्च २०२६

गुढीपुजन स. ९ वा.: मा.कृषिकेश रावले, पोलिस उपायुक्त परिमंडळ १ यांच्या शुभहस्ते

स्थळः श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर

मंदिराच्या ४३व्या स्थापना दिनानिमित्ताने **संगीत महोत्सव**

उद्घाटकः मा.सौ.मंजुषाताई नागपुरे, महापौर, पुणे मनपा

स्थळः नूमवि प्रशाला, बाजीराव रोड, पुणे

| दिनांक | वेळ | गायक कलाकार | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| गुरुवार १९ मार्च | सायं.५ ते ६ | पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा आणि तारपा पथक | तारपा वादन व नृत्य |
| | सायं.७ ते १० | श्रीधर फडके आणि समूह | फिटे अंधाराचे जाळे |
| शुक्रवार २० मार्च | सायं.५ ते ६ | पंडित उपेंद्र भट आणि सहकारी | गुरु गणेश |
| | सायं.७ ते १० | नंदेश उमप भट आणि ७५ कलाकार | नंदेश वत्सला विठ्ठल उमप प्रस्तुत मी मराठी |
| शनिवार २१ मार्च | सायं.५ ते ६ | खंडेराव मुळे आणि सहकारी | स्वरयात्रा |
| | सायं.७ ते १० | कुणाल गांजावाला | लाईव्ह कॉन्सर्ट |
| रविवार २२ मार्च | सायं.५ ते ६ | नटरंग अकादमी, पुणे | त्रिपुंड |
| | सायं.७ ते १० | राणी वर्मा, वंदना गुप्ते, भारती आचरेकर,शैला दातार, सावनी दातार, निलाक्षी पेंढारकर, दीपिका जोग आणि हृदया दातार, निवेदकः अस्मिता पांडे | माणिक वर्मा फाउंडेशन निर्मित अमृताहुनी गोड |
| सोमवार २३ मार्च | सायं.५ ते ६ | स्वरपज्ञा पं.मिलिंद रायकर आणि यज्ञेश रायकर | व्हायोलिन जुगलबंदी |
| | सायं.७ ते १० | पद्मश्री पं. हृदयनाथ मंगेशकर आणि सहकारी | भावसरगम |

व्यवस्था: सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे - प्रवेश विनामूल्य






# संपादकीय

## घोषणा सोपी, कृती अवघड

बंदीने समस्या संपते का? कायद्याने लादलेली बंदी जास्त प्रभावी असते, की समाजप्रबोधनाने विचारपूर्वक समूळ नष्ट केलेलं तिचं अस्तित्व? कारण, कायदा आला, की त्यामागून पळवाटा येतात. कायदा तर्कशुद्ध करण्याच्या गरजेतून इतके प्रश्न निर्माण होतात, की त्यात मूळ कायद्याची व्यवहार्यताच बऱ्याचदा संपून जाते. जी गोष्ट व्यवहार्य नसेल, तिची अंमलबजावणी कशी होणार? इथे तर संबंध थेट बालमनाशी आहे. वयाच्या सुरुवातीच्या वर्षात मुलांची वाढ नीट व्हावी यासाठी त्यांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचा विचार सर्वप्रथम ऑस्ट्रेलियात झाला. ऑस्ट्रेलियानंतर इंडोनेशियाने त्याची री ओढली. दक्षिण कोरिया, सिंगापूर, फ्रान्स, स्पेन या देशांनीही त्यासाठी वेगवेगळ्या उपायांचं सूतोवाच केल्यानंतर आता संपूर्ण युरोपच समान उपाययोजनेच्या शक्यतेचा विचार करतो आहे. जी समस्या साऱ्या जगाला सतावते आहे, ती भारतासमोर नाही, असं कसं होईल? भारतातील एकूण लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येतील किशोर-तरुणांची मोठी संख्या या समस्येला इथे कितीतरी पटीने मोठी करते. भारतात या प्रश्नाला सर्वप्रथम वाचा फोडली, ती कर्नाटकाने. परदेशातील विचारमंथनाचा परिणामही असेल, पण कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आपल्या राज्यात १६ वर्षांखालील मुलांना समाज माध्यमं वापरण्यावर बंदी आणण्याची घोषणा केली. आंध्रचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनीही लगेच १३ वर्षांखालील मुलांच्या समाज माध्यम वापरावर बंदीची घोषणा केली. 'तीन महिन्यांत ही बंदी लागू होईल' अशी त्यासाठीची कालमर्यादाही त्यांनी जाहीर करून टाकली. या दोन राज्यांनंतर बिहारचे मावळते मुख्यमंत्री नितीशकुमार आणि आत्ताच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही 'आपलाही तसा विचार सुरू असल्या'चं बोलून दाखवलं. मुलांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्याची गरज जगभर कशी समान पद्धतीने जाणवते आहे, ते या सगळ्या घोषणांवरून दिसतं. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी थेट बंदीचीच घोषणा केली असली, तरी ही बंदी नेमकी कशी प्रत्यक्षात आणणार, ते अद्याप स्पष्ट केलेलं नाही. कारण, डिजिटल जगात कोणतीही बंदी आणणं आणि तिची यशस्वी अंमलबजावणी करणं मोठं जिकिरीचं असतं. सरकारने आपली पूर्ण ताकद लावल्याशिवाय आणि देशाबाहेरून चालवण्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मचं सहकार्य मिळवल्याशिवाय अशी कुठलीही बंदी शक्य होत नाही, हा या पूर्वीचा अनुभव आहे. बंदीची घोषणा जितकी सोपी आणि आकर्षक, तेवढीच तिची अंमलबजावणी कठीण असते! यापूर्वी जगभर अनेकदा विचारला गेलेला प्रश्न यानिमित्ताने पुन्हा विचारला जातो आहे : बंदीने समस्या संपते का? कायद्याने लादलेली बंदी जास्त प्रभावी असते, की समाजप्रबोधनाने विचारपूर्वक समूळ नष्ट केलेलं तिचं अस्तित्व? कारण, कायदा आला, की त्यामागून पळवाटा येतात. कायदा तर्कशुद्ध करण्याच्या गरजेतून इतके प्रश्न निर्माण होतात, की त्यात मूळ कायद्याची व्यवहार्यताच बऱ्याचदा संपून जाते. जी गोष्ट व्यवहार्य नसेल, तिची अंमलबजावणी कशी होणार? इथे तर संबंध थेट बालमनाशी आहे. दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञान आहे. माहिती तंत्रज्ञान इतक्या झपाट्याने नवनव्या गोष्टी येत आहेत, तंत्रज्ञान इतक्या वेगाने प्रगत होत आहे, की कोणीही म्हटलं तरी या तंत्रज्ञानाला आपल्या पकडीत ठेवून थांबवू शकणार नाही. यासंदर्भात याआधीही काही प्रयोग झाले आहेत. विशेषतः मुक्त लैंगिक आणि अश्लील चित्रफिती दाखवणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मसंदर्भात. आजही ओटीटीवरील अनेक वेब सिरीज, चित्रपट प्रौढांसाठी असतात. ते पाहण्यासाठी तिथे गेलं, की दर्शकाला आधी त्याचं वय विचारलं जातं. दर्शकाने सोयीनुसार आपलं वय नोंदवलं, की त्या 'प्लॅटफॉर्म'ची सगळी दारं दर्शकासाठी क्षणात खुली होतात. दर्शकाने टाकलेलं त्याचं वय खरं, की खोटं हे तपासण्याची कुठलीही सोय तिथे नाही. त्यामुळे, आजही अडसर आहे; पण तो अगदी सहजपणे बाजूला करता येईल असाच ठेवला आहे. ज्या राज्य सरकारांनी आता बंदीची घोषणा केली आहे, त्यांना या बाबी लक्षात घेऊन सहजासहजी दूर करता येणार नाही, असा अडसर घालावा लागेल!

# गुरु वचन

## आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई-वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात.

जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु-संत व महापुरुषांनी आई-वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई-वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई-वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा सांभाळ किंवा पालन-पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई-वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई-वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.

बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई-वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई-वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई-वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई-वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई-वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई-वडिलांची सेवा प्रथम होती.

प्राचीन भारतात आई-वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार-प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई-वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकारीचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले.

आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला.

आज काही लोक आपल्या आई-वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत असाच व्यवहार करतील.

# पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:शुक्ल २५:१६:२८+ |
| १९ मार्च २०२६ | करण:नाग ०६:५३:१४ |
| गुरूवार | करण:किस्तुघ्न |
| विक्रम संवत्- २०८२ | १७:५५:५८ |
| चैत्रशके संवत्- १९४७ | करण:बव २८:५२:३३+ |
| संवत्सर - पराभवनाम | सूर्य:मीन |
| अयन- उत्तरायणारंभ | चन्द्र:मीन |
| मास- फाल्गुन चैत्र | हिजरी सन् - १४४६ |
| ऋतु- सौर वसंत | मुस्लिम मास - रमजान |
| कृष्ण पक्ष | तारीख - २९ |
| तिथि:अमावस्या | विशेष |
| ०६:५३:१४ | गुढीपाडवा |
| शुक्ल पक्ष | श्री शालिवाहन शके |
| तिथि:प्रतिपदा | १९४८ प्रारंभ |
| २८:५२:३३+ | पराभव संवत्सरांभ |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद | डॉ. हेडगेवार जयंती |
| २८:०४:३८+ | चैत्री नवरात्रारंभ |

# दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८९१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | | 1 | 8 | | 9 | |
| 8 | | | | | 6 | 7 | | 2 |
| | 1 | 5 | | | 7 | 3 | 8 | |
| | 7 | 3 | | | | 1 | | 5 |
| 5 | | | | | | | | 7 |
| 1 | | 2 | | | | 9 | 3 | |
| | 5 | 1 | 2 | | | 6 | 7 | |
| 4 | | 6 | 9 | | | | | 3 |
| | 8 | | 6 | 5 | | | 4 | |

: सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८९० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 8 | 5 | 6 | 4 | 2 | 9 | 3 |
| 6 | 5 | 2 | 9 | 7 | 3 | 1 | 8 | 4 |
| 3 | 9 | 4 | 1 | 2 | 8 | 5 | 6 | 7 |
| 1 | 8 | 7 | 3 | 9 | 6 | 4 | 5 | 2 |
| 4 | 3 | 5 | 2 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 2 | 6 | 9 | 4 | 5 | 1 | 3 | 7 | 8 |
| 9 | 4 | 6 | 8 | 3 | 5 | 7 | 2 | 1 |
| 8 | 7 | 3 | 6 | 1 | 2 | 9 | 4 | 5 |
| 5 | 2 | 1 | 7 | 4 | 9 | 8 | 3 | 6 |

# इतिहासात आजचा दिवस

## आंतरराष्ट्रीय

- १९४५ - जपानमध्ये कमीकेज हल्ल्यात ८०० ठार.
- १९५० - बेब डीड्रीक्सन-झहारियसने पाचवा युएस ओपन गोल्फ चॅम्पीयनशीप जिंकली.
- १९८२ - नॅशनल गॉर्ड जेट टॅंकरच्या अपघातात २७ ठार.
- १९९५ - जपानमध्ये विषारी गॅसने ५ जणांचा बळी.

## राष्ट्रीय

- १९७२ - भारत आणि बांगलादेश दरम्यान मैत्री करार.
- २००७ - पेस व डॅमने पॅसिफिक लाइफ ओपन टेनिस स्पर्धेच्या दुहेरीचे अजिंक्यपद जिंकले.
- २००८ - महाराष्ट्राचे अर्थमंत्री जयंत पाटील यांनी राज्याच्या विधिमंडळात अर्थसंकल्प सादर केला. माजी अर्थमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्यानंतर पाटील हे सलग दहाव्यांदा अर्थसंकल्प सादर करणारे एकमेव अर्थमंत्री ठरले.

## जन्म

- १७७७ - डॅच शिक्षण मंत्री अंटन आर. फ्लक यांचा जन्म.
- १८५१ - अर्जेंटिनियाचे राष्ट्रपती रोकी सेन्ज़ पेना यांचा जन्म.
- १८८९ - पोर्तगालच्या शेवटचा राजा मनोईल दुसरा यांचा जन्म.

## निधन

- १७०२ - इंग्लंडचा राजा विलियम तिसरा हेन्री याचे निधन.
- १९७४ - फॅशन डिझायनर अनी क्लीनचे निधन.
- १९८२ - अभिनेता ॲलन बडेल याचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन.
- २००८ - आर्थर सी. क्लार्क, अवकाश, विज्ञान आणि भविष्य या विषयांबद्दलचे द्रष्टे लेखक यांचे निधन.
- २००८ - रघुवरन, प्रसिद्ध अभिनेता यांचे निधन.

# : SMS :

2 shardar train
k pichhe bhaag
rahe the.
1 chad gaya to train
me logon ne kaha
" WEL DONE"..
Sardar- Oh shit!!..
jana to use tha,mai
to chhodne
aaya tha..

# हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.२ | २१.७ |
| अहमदनगर | ३०.६ | २०.९ |
| अकोला | ३५.८ | २४.४ |
| अमरावती | ३५.१ | २४.९ |
| बीड | ३६.६ | २४.९ |
| भंडारा | ३७.२ | २३.७ |
| बुलढाणा | २८.४ | १४ |
| चंद्रपूर | ३६.४ | २५.२ |
| चेन्नई | ३६.१ | २२.२ |
| नवी दिल्ली | २९ | १७.३ |
| धुळे | ३३.३ | २१.९ |
| गोंदिया | ३४.४ | २३ |
| जळगाव | ३५.६ | २३.७ |
| कोल्हापूर | ३१.७ | १८.१ |
| लातूर | ३२.१ | २३.३ |
| मुंबई | ३२.३ | २५.६ |
| नागपूर | ३५.३ | २३.८ |
| नांदेड | ३५.४ | २४.५ |
| नंदूरबार | ३१.५ | २२.१ |
| नाशिक | ३१.५ | १७.९ |
| पुणे | ३०.७ | १८.८ |
| पंढरपूर | ३४.४ | २२.८ |
| सातारा | ३२.२ | १७.७ |
| सांगली | ३३.१ | १९.७ |
| सोलापूर | ३३.५ | २४.९ |
| वर्धा | ३६.४ | २५.३ |

# आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा : पूर्व कामातील स्थान बदलल्याने व अस्थिरतेमुळे मन दु:खी होईल.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पूर्व मोठी योजना आखण्याचे विचार येतील. अधिकारामध्ये वाढ होईल.

**वृषभ :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: पश्चिम अडकून पडलेली रक्कम मिळण्याचे योग आहेत. राजकीय अधिकाऱ्यांपासून सहकार्य मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व धावपळ केल्याने आपली कामे पार पडणार आहे. नौकरीमध्ये बदल होण्याची शक्यता. मुलांच्या बाबतीत मन उदार राहील.

**मिथुन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण अडकून पडलेली कामे मार्गी लागतील. आर्थिक गुंतवणूकीत फायदा होईल.

**धनु :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम स्थावर मालमत्ता उदा. जमीन, जागा, घर या संदर्भातील चाललेली बोलणी आपल्या बाजूने राहील.

**कर्क :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम अंधविश्वासापूस लांब राहून आलेल्या संधीचा फायदा उठवा.

**मकर :** शुभ रंग : काळा,शुभ दिशा:पूर्व सकारात्मक परिणाम अनुभवण्याची आशा ठेवू शकता. व्यापारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पूर्व अनकूल परिणाम मिळण्यासाठी सक्रीय राहणे आवश्यक आहे. अचानक धन मिळण्याचे योग आहेत.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा :दक्षिण निर्णय घेण्यासंबंधी द्विधा मनस्थिती निर्माण होईल त्यामुळे कार्याची गती कमी होईल. कौटुंबिक चिंता वाढणार आहे.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पूर्व मुलांच्या कामापासून समाधान मिळेल. जोखमीचे कामे स्विकारणे योग्य ठरणार नाही.

**मीन :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा : पश्चिम आपल्या नि:स्वार्थी वृत्तीमुळे आपल्याला फायदा होईल. व्यापारात गुंतवणूक फायदेशीर राहील.

# 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९१



**आडवे शब्द**

१. प्रवासात उपयोगी
३. पाण्याचा साठा, तळे
७. बळजबरीचा मुक्काम
११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे
१२. धातूचा नाजूक तंतू
१३. लाकडाची उत्कृष्ट जात
१४. समुदाय, गट
१६. एक नैसर्गिक शीतपेय
१७. थडगे
१८. मृत्यू नसलेला
१९. मान, प्रतिष्ठा, बूज
२०. सुकुमार
२१. चंदन उगाळण्याचा दगड
२४. मधली खोली
२६. गावातील देवाचा उरुस
२७. 'एनओसी' मराठीत
३१. पुढारी
३२. लढाई, चकमक
३३. जागृत, चकमक
३३. जागृत, स्थान
३५. हुशार, चलाख
३७. श्रेष्ठ पुरुष
३९. सुतळीचे कापड
४२. तिंबा!
४४. पुत्र, मुलगा
४६. फसविणे
४८. कान व डोळे ताठ करणे
५०. सैन्याचा मालपुरवठा
५२. वजा
५३. सरस्वतीचे एक नाव
५६. माराची खूण
५७. क्षण (हिंदी)
५८. ओलसर हवा
६०. पुन्हा पुन्हा
६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी
६४. पुंकेसर
६५. मत्स्य
६७. बोलणे
६९. मुलगा
७०. टाळ्यांचा जोरदार आवाज
७१. अगम्य
७३. खटला
७५. स्तुती करणारा
७६. अस्वल
७७. जन्म, मृत्यू
७८. तटबंदी

**उभे शब्द**

१. चाहता
२. यामुळे रामायण घडले
३. जन्मदात्री
४. नेहमी बुजणारा
५. बाण
६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान
७. ठाण्याचा रहिवासी
८. वाघाची मावशी
९. भीती, भय
१०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव
१३. सामोपचार
१५. भाताला दिलेला आकार
१८. धाकटा भाऊ
२०. हुक्की, लहर
२१. च्या बरोबर
२२. जय-पराजय
२३. कर्ज, उपकार
२४. फक्त, केवळ
२५. जाते फिरतानाचा आवाज
२६. जन्मापासून
२७. ख्रिसमस
२८. शिव्याशाप
२९. हत्तीचा शिक्षक
३०. वारा
३२. वर्ष
३४. थंडीने गार पडणे
३६. दारूचा एक प्रकार
३८. आवाज, गोंगाट
४०. रोखलेली नजर
४१. एक जंगली फूल
४३. वरपांगी
४५. सोसाट्याचा वारा
४७. अवाढव्य, भव्य
४९. उणे
५१. नवऱ्याची दुसरी पत्नी
५२. संयम सुटलेला, अधीर
५४. बरणीला लावण्याचे फडके
५५. विहीर, --नलिका
५७. मान्यतापत्र
५९. नंतर
६०. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
६१. थेट, सरळ
६२. धोबी
६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात
६६. बडबड
६८. नोकरी
७१. शर्त, पण
७२. फोडातील द्रव
७४. डावा

उत्तर उद्याच्या अंकात


**जम्बो शब्दकोडे क्र. ८९० चे उत्तर**

आडवे उत्तर : १.श्रीराम जयराम जयजयराम २.अट १२.हित १३.जनन १४.मम १५.रमावर १६.तबला १७.खस १८.तारा २०.रावण २२.हौस २४.जर २५.कडक २७.गदा २९.खळखळाट ३०.दादला ३१.तुलसीदास ३३.मदन ३४.काजळ ३६.पुरा ३८.हमाल ३९.गारवा ४०.सर्वत्र ४१.हालचाल ४२.महाशय ४४.नफा ४६.पातक ४७.वार ४९.वाकडा ५२.कवच ५४.खरवस ५६.काजळी ५८.कडप्पा ५९.लामणदिवा ६०.रानटी ६२.सखी ६३.लगत ६५.बत्ती ६६.तलवार ६९.मदार ७०.बेकायदा ७२.डाकीण ७३.गरज ७४.सरदार ७५.सदरा ७७.रबर ७८.वंदन ८१.जागरण ८२.रातवा ८३.कारखाना

उभे उत्तर : १.श्रीमंत २.महिला ३.जत ४.राजस ५.मन ६.जनता ७.जम ८.यमराज ९.मरण १०.अवघड ११.टर १७.खसखस १९.रागीट २१.वरदान २३.पाखर २५.कलाकार २६.कमळ २७.गल २८.दासीपुत्र ३१.तुळस ३२.दारा ३३.मलम ३५.जवान ३७.लोलक ३८.हलवा ३९.गायक ४१.हातचलाखी ४३.शवासन ४५.फासळी ४६.पाव ४८.रखवालदार ५०.डाका ५१.चाकवत ५२.कप्पा ५३.आणखी ५५.वरात ५७.जबाबदार ६१.टीकाकार ६२.सरडा ६४.गरजवंत ६७.लवाद ६८.रणरण ६९.मगर ७०.बेसन ७१.यदा ७५.सख्य ७६.राजा ७९.दवा ८०.ताना

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या तयारीचा दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा

पुणे (दैनिक संध्या) : बारामती विधानसभा मतदारसंघ (२०१) पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नियुक्त नोडल अधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने विविध विभागांना सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पडावी यासाठी आवश्यक नियोजन, मनुष्यबळाची उपलब्धता, साहित्य वितरण, प्रशिक्षण कार्यक्रम, तसेच आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी याबाबत सूचना देण्यात आल्या. यावेळी मतदान केंद्रांची तयारी, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांची तपासणी,एमसीएमसी आणि माध्यम कक्ष कामकाज, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तसेच मतदार जागृती उपक्रम (SVEEP) प्रभावीपणे राबविण्याबाबतही चर्चा करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्व नोडल अधिकाऱ्यांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश उपजिल्हानिवडणूक अधिकारी कळसकर यांनी दिले. बैठकीस विविध विभागांचे नोडल अधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### नाराजीबद्दलचे वृत्त गैरसमजातून आल्याचा वाडेकर यांचा खुलासा

पुणे (दैनिक संध्या) : रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) भारतीय जनता पक्षाचा मित्रपक्ष असल्याने महापालिकेत आपल्याला उपमहापौर पद मिळाले असले तरी योग्य तो मानसन्मान मिळत नसल्याने आपण नाराज असल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झाले आहे. हे वृत्त गैरसमजातून आले असून आपली कशाबद्दलही नाराजी नाही, असा सुस्पष्ट खुलासा उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केला आहे. महापालिकेच्या अनेक कार्यक्रमांना आणि बैठकांना उपमहापौरांना निमंत्रण दिले जात नाही. विशेषतः खुद्द वाडेकर यांच्या प्रभागात झालेल्या महापौर चषक स्पर्धेला त्यांना निमंत्रण नव्हते, असे या वृत्तामध्ये नमूद करण्यात आले आहे. मात्र, हा प्रकार तांत्रिक त्रुटीमुळे झाल्याचे स्पष्टीकरण वाडेकर यांनी दिले. रिपब्लिकन पक्ष महापालिका निवडणूक भाजपच्या सोबत राहून लढला. महापालिका विषयातील आपल्या पक्षाचे योगदान लक्षात घेऊन भाजपने आपल्याला उपमहापौर पद दिले. पदाबरोबरच योग्य प्रकारे मानसन्मान देखील भाजपकडून मिळत आहे. त्यामुळे नाराजीचे कोणते कारणच नाही, असे वाडेकर यांनी स्पष्ट केले. भाजप आणि रिपब्लिकन पक्ष हे दीर्घकालीन मित्र पक्ष असून ते सत्ता आणि पदासाठी एकत्र आलेले नाहीत. व्यक्तिगत मानसन्मानावरून या मित्र पक्षांमध्ये धुसफूस होणे केवळ अशक्य आहे. भाजप आणि रिपब्लिकन पक्ष हे आजही मित्रपक्ष आहेत आणि यापुढेही मित्रपक्ष राहतील. एकोप्याने आणि कार्यक्षमतेने महापालिकेच्या कारभाराचा गाडा सुरळीत चालवून पुणेकरांचे जीवन सुलभ, समृद्ध आणि समाधानी करणे हेच आमचे समान उद्दिष्ट आहे, असेही वाडेकर यांनी सांगितले. तसेच मी कुठलीही बैठक किंवा पत्रकार परिषद घेतली नाही तरी कारण नसताना अशा बातम्या आल्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन 22 मार्च रोजी पुण्यात




■ केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते उद्घाटन

पुणे (दैनिक संध्या) : पद्मपाणी फाउंडेशन आयोजित तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाच्या सहकार्याने अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन रविवारी, २२ मार्च २०२६ रोजी पुण्यातील सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन, भवानी पेठ (टिंबर मार्केट) येथे आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे संमेलन पार पडणार आहे. या संमेलनाचे उद्घाटन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा. रामदास आठवले यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास भदंत हर्षबोधी महाथेरो, आंतरराष्ट्रीय धम्म प्रसारक मा. गगन मलिक, पुणे मनपाचे उपमहापौर मा. परशुराम वाडेकर, अखिल भारतीय पाली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. बिमलेंद्र कुमार आणि पुणे मनपाचे माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे हे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित राहणार आहेत. संमेलनात देशभरातील पाली भाषा व बौद्ध अध्ययन क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये डॉ. महेश देवकर, अतुल भोसेकर, डॉ. योजना भगत, धम्मदिप वानखेडे , डॉ. गौतम चाबुकस्वार आणि पद्मपाणी फाउंडेशनच्या संचालिका सुवर्णा डंबाळे आदी मान्यवर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. पाली भाषा, बौद्ध साहित्य, संशोधन आणि सांस्कृतिक परंपरा यांवर विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात येणार असून पाली भाषेच्या प्रचार, प्रसार आणि संवर्धनासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. मागील वर्षी झालेल्या संमेलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

## 'नारी तुझे सलाम – सीझन ३' पुरस्कार सोहळ्यात १०० हून अधिक महिलांचा सन्मान

पुणे (दै. संध्या) :



महिलांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला "नारी तुझे सलाम – सीझन ३" हा भव्य पुरस्कार सोहळा नुकताच पुण्यात मोठ्या उत्साहात पार पडला.

आंतरराष्ट्रीय महिला दिन सप्ताह निम्मित, रविवारी प्लिंक्स क्रिएटिसिटी मॉल येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १०० हून अधिक महिला व मान्यवरांचा या वेळी गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन आणि क्युरेशन प्रसिद्ध इव्हेंट आयोजिका नीता रझदान कौल यांनी केले. गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ त्यांनी विविध पेजंट्स, फॅशन शो, पुरस्कार सोहळे तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले आहे. "नारी तुझे सलाम" हा उपक्रम महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ बनला असून, यंदा या उपक्रमाचा तिसरा पर्व यशस्वीरीत्या पार पडला.

या सोहळ्यात डॉक्टर, शिक्षण, फॅशन, कला, उद्योजकता, सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. समाजात प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कार्याची दखल घेणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये रामभाऊ दाभाडे, ऐश्वर्या सुरेंद्र पाठारे, लीना मोदी, मुक्ता जगताप, कर्नल कुलबीर सिंह, मीना काकी सातव, रेनू सिंह, गौरव वाघोलिकर, अभिनव रिटापुरे, आदेश थोरात, स्वराज भाविस्कर आणि अजित संकल्प यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी, टाइम्स ऑफ पुणे, अर्जुन जगताप फाउंडेशन, रोटरी क्लब ऑफ पुणे खराडी, रोटरी क्लब ऑफ पुणे कल्याणी नगर, मेडियाट्री आणि अनुप प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड या संस्थांनी सहकार्य केले. दरम्यान, आयोजिका नीता रझदान कौल यांनी लवकरच "मिस अँड मिसेस महाराष्ट्र" हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील महिलांच्या प्रतिभेला आणि आत्मविश्वासाला नवे व्यासपीठ मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

## भारती विद्यापीठाचे राष्ट्रीय युवा महोत्सवात दणदणीत यश

पुणे (दै. संध्या) :

■ तीन सुवर्णपदकांसह रौप्य आणि कांस्यपदकांची कमाई

भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाने राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात उल्लेखनीय यश संपादन करत विविध स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली. 'असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज'तर्फे सथ्यभामा इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, चेन्नई येथे महोत्सव आयोजित करण्यात आला होता. देशभरातील २८ राज्यांमधील ८ झोनमधून पात्र ठरलेल्या १४५ विद्यापीठांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत भारती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आपली कला आणि कौशल्य सिद्ध करत एकूण सात गटांमध्ये पदके पटकावली.

यामध्ये शास्त्रीय संगीत प्रकारात शडज अय्यर, सुगम संगीत प्रकारात नंदिनी गायकवाड आणि शास्त्रीय वाद्यसंगीत (स्वर वाद्य) प्रकारात संजुक्ता फुकान यांनी सुवर्णपदके मिळवली. तसेच लोकवाद्यवृंद (फोक ऑर्केस्ट्रा) आणि सांस्कृतिक मिरवणूक (कल्चरल प्रोसेशन) या गटांमध्ये रौप्यपदकांची कमाई करण्यात आली.

## धर्मांतरणाच्या सामाजिक-आर्थिक पैलूंवर अधिक काम करण्याची गरज

*डॉ. हुलगेश चलवादी : कायद्याच्या चौकटीसोबतच सामाजिक कारणांची मिमांसा आवश्यक*

पुणे (दै. संध्या) :



विधानसभा आणि विधानपरिषदेत 'धर्म स्वातंत्र्य विधेयक' मंजूर झाल्यानंतर बहुजन चळवळीतील नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी विधेयकाचे स्वागत केले आहे. सध्या धर्मांतरणाच्या सामाजिक तसेच आर्थिक पैलूंवर अधिक काम करण्याची गरज असल्याचे मत डॉ.चलवादी यांनी यानिमित्ताने बुधवारी (ता.१८) व्यक्त केले आहे.

कुठल्याही व्यक्तीवर बळजबरीने किंवा प्रलोभन दाखवून धर्मांतर करणे हे लोकशाहीत चुकीचेच आहे. गृहराज्यमंत्र्यांनी मांडलेल्या विधेयकात ६० दिवस आधी नोटीस देण्याची जी अट आहे, ती पारदर्शकता आणण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. जर कोणावर अन्याय होत असेल, तर त्याला वाचा फोडण्यासाठी ७ वर्षांच्या शिक्षेची तरतूद हा एक ठोस धाक निर्माण करेल, असे डॉ.चलवादी म्हणाले.

मात्र, केवळ कायदा करून धर्मांतर थांबवता येईल का? हा प्रश्न आजही कायम आहे. समाजात जिथे गरिबी, अज्ञान आणि उपेक्षा असते, तिथेच धर्मांतराला वाव मिळतो. जर सरकारी यंत्रणा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली आणि त्यांना सामाजिक सुरक्षा मिळाली, तर कोणालाही धर्मांतराचा विचार करण्याची गरज पडणार नाही, असे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले.

कायद्याची अंमलबजावणी करताना कोणत्याही निष्पाप व्यक्तीला त्रास होणार नाही याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे. जुन्या काळातील 'पाव टाकून धर्मांतर' करण्याच्या पद्धती आता इतिहास जमा झाल्या असल्या तरी, आधुनिक काळातील छुप्या प्रलोभनांना रोखण्यासाठी सामाजिक प्रबोधन हाच सर्वोत्तम मार्ग असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

डॉ.चलवादी यांनी या विधेयकाचं समर्थन करतानाच, बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आणि त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सरकारने अधिक सक्रिय व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. "कायदा हा शेवटचा पर्याय असावा, पण सामाजिक समता आणि आर्थिक सक्षमीकरण हे धर्मांतराला रोखण्याचे कायमस्वरूपी उपाय आहे, असे डॉ.चलवादी म्हणाले.

## जनता हॉस्पिटलमध्ये 'एनसीओ' कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (दै. संध्या) :



पर्वती येथील जनता वसाहतमध्ये असणाऱ्या जनता दवाखान्यामध्ये 'एनसीओ' कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. ज्या तपासण्या सर्वसामान्यांना करणे परवडत नाही अशा तपासण्या 'एनसीओ' कॅम्पअंतर्गत करण्यात आल्या. यात प्रामुख्याने थुंकी तपसणी, ब्लड प्रेशर, शुगर, थायरॉईड तसेच कॅन्सरच्या ओरल टेस्ट यांचा समावेश आहे. या तपासण्या सर्वांसाठी मोफत असल्या तरी यामध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यात गरोदर महिलांच्याही अत्यावश्यक तपासण्या करण्यात आल्या.

अशा प्रकारचे शिबिरे कायम भरवले जातात त्यामुळे सर्वसामान्यांचे आरोग्य जपले जाते. रिपोर्टमध्ये त्रुटी जाणवल्यास औषध गोळ्यांनी बरे केले जाते असे वैद्यकीय अधिकारी तहुरा शेख यांनी सांगितले. हे शिबिर डॉ. तहुरा शेख, वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले होते. हे शिबिर यशस्वीरित्या पार पडावे यासाठी सुप्रिया ओव्हळ, छाया तोटरे, छाया कुंभार, निखिल गायकवाड, रोहित अभंग, सचिन साळुंके याचप्रमाणे सर्व 'आशा'ताई यांचे सहकार्य लाभले.

## वीरधवल जगदाळे यांची उपाध्यक्षपदाची हुलकावणी, थेट अध्यक्षपदाला गवसणी

पुणे (दै. संध्या) :

पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ सदस्य वीरधवल कृष्णराव जगदाळे यांची बिनविरोध निवड झाल्याने पक्षनिष्ठ व संयमी कार्यकर्त्याचा बहुमान झाला आहे. उपमुख्यमंत्री तथा पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा अजित पवार यांनी पक्षाच्या वाढीसाठी पुणे जिल्हा परिषद सभागृहातील अनुभवी सदस्य तथा दिवंगत अजित पवार यांचे विश्वासू सहकारी असलेले वीरधवल जगदाळे यांना अध्यक्षपदावर काम करण्याची संधी दिली आहे. दौंड तालुक्याला १९ वर्षांनंतर पुन्हा अध्यक्षपद मिळाले आहे. पुणे येथे पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेनंतर वीरधवल जगदाळे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. ७३ सदस्यीय पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ५१ सदस्य असून बहुमतासाठी ३७ हे संख्याबळ आवश्यक आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू सहकारी अशी राज्यभरात ओळख असलेले वीरधवल जगदाळे यांना दोन वेळा पुणे जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षपदाची संधी होती. परंतु पक्षाने थांबण्याची सूचना केल्यानंतर त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यावेळी माघार घेतली.

## एम. आर्च. करू इच्छिणाऱ्यांसाठी सेप्ट विद्यापीठात नवीन संधी

■ आर्किटेक्ट्ससाठी करिअरचे मार्ग प्रशस्त करणारे नवीन विशेष अभ्यासक्रम

CEPT UNIVERSITY

पुणे (दै. संध्या) :

नवीन शहरांची रचना करताना पर्यावरणीय आव्हानांचा सामना करण्यासाठी सेप्ट विद्यापीठातील आर्किटेक्चर शाखेत दोन विशेष पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. मास्टर्स इन कन्झर्वेशन अँड रीजनरेशन (एमसीआर) आणि मास्टर्स इन लँडस्केप आर्किटेक्चर (एमएलए) अशी या अभ्यासक्रमांची नावे असून त्यामुळे आर्किकेक्ट्ससाठी संधी वाढणार आहेत. या अभ्याभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ आहे.

विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, मास्टर्स इन कन्झर्वेशन अँड रीजनरेशन या अभ्यासक्रमात संवर्धन या विषयाला प्रामुख्याने एक मूलगामी डिझाईनची पर्यावरणीय कृती मानण्यात आले आहे. त्यामुळे आजूबाजूच्या विकासविषयक दबावांना एकीकृत करू शकतील अशा ऐतिहासिक संरचनांचे सर्जनशील आणि जबाबदार पुनर्मांडणी करता येईल. इतिहास, तंत्रज्ञान, स्थापत्य आणि शहरी डिझाईन यांच्या संयोगामध्ये ज्यांना रस आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

मास्टर्स इन लँडस्केप आर्किटेक्चर (एमएलए) हा अभ्यासक्रम हवामान बदल आणि पर्यावरणीय परिवर्तनाला प्रतिसाद देणारा आहे.लँडस्केप आर्किटेक्चरमधील एम.आर्च हा अभ्यासक्रम व्यावसायिकांना लँडस्केप, पर्यावरणशास्त्र आणि समाज यांच्या संयोगावर काम करण्यासाठी तयार करणारा आहे. हा अभ्यासक्रम बागकामाच्या पलीकडे जाऊन भारतातील वाढत्या पर्यावरणीय, सामाजिक आणि शहरी आव्हानांना संबोधित करतो. तो लँडस्केपकडे एक गतिमान प्रणाली या दृष्टीने पाहून प्रादेशिक पाणलोट क्षेत्रांपासून ते शहरी सार्वजनिक जागांपर्यंत सर्व पातळींवर डिझाईन करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देतो. यातील पदवीधर व्यवसाय, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या ५०० पेक्षा अधिक व्यावसायिकांच्या माजी विद्यार्थ्यांच्या जागतिक नेटवर्कमध्ये सहभागी होतील.

या अभ्यासक्रमांमध्ये वास्तुकला शिक्षणाचे विकसित स्वरूप आणि भारताच्या बांधणी व नैसर्गिक वातावरणाला आकार देण्यासाठी आंतरविद्याशाखीय तज्ज्ञांची वाढती गरज याचे एकत्रितपणे प्रतिबिंब पडले आहे.

सेप्ट विद्यापीठात मध्ये पदव्युत्तर शिक्षण हा केवळ पदवीपूर्व कार्यक्रमाचा विस्तार नसतो. ते जाणीवपूर्वक विशेषीकरणाचे एक स्थान असते. इथे स्टुडिओ हे प्रयोगशाळा म्हणून, वास्तविक जगातील आव्हानांच्या सर्जनशील अन्वेषणासाठी एक जागा म्हणून काम करतात. इथे लहान गट तज्ज्ञ शिक्षकांसोबत युक्तिवाद विकसित करण्यासाठी, प्रोटोटाइपची चाचणी घेण्यासाठी आणि सातत्याने समीक्षा करून भूमिका अधिक सुधारण्यासाठी काम करतात. सेमिस्टर आणि उन्हाळी व हिवाळी स्कूलमध्ये पसरलेले हे अभ्यासक्रम व्यापक बांधणी वातावरणाच्या क्षेत्रातील विस्तृत शोधाची श्रेणी उघडते. विद्यार्थ्यांना कार्यशाळा, सॉफ्टवेअर, ग्रंथालय, अभिलेखागार, साहित्य प्रयोगशाळा आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिकांचे विस्तृत नेटवर्क या स्वरूपातील विस्तृत संसाधने उपलब्ध होतात.

## युद्धकाळ : गुंतवणुकची गुरुकिल्ली 'तिच्या' हाती

**डॉ. पूनम टंडन, मुख्य गुंतवणूक अधिकारी, इंडिया फर्स्ट लाईफ इन्शुरन्स कंपनी लि.**

पुणे (दै. संध्या) :



फेब्रुवारी २०२५ मध्ये वेल्स फार्गो इन्व्हेस्टमेंट इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की महिलांना गुंतवणुकीत पुरुषांपेक्षा चांगला परतावा मिळू शकतो. कारण महिला गुंतवणूक करताना अधिक शिस्तबद्ध आणि विचारपूर्वक निर्णय घेतात. वॉरिक बिझनेस स्कूलच्या संशोधनानुसार महिला जोखमीच्या आणि अंदाजावर आधारित शेअर्समध्ये गुंतवणूक करण्याची शक्यता कमी असते. तोटा होत असल्यास त्या अशा गुंतवणुकीतून लवकर बाहेर पडतात. महिलांना जोखीम ओळखण्याची क्षमता चांगली असते, त्यामुळे त्या आपली गुंतवणूक वेगवेगळ्या पर्यायांमध्ये विभागतात. त्या आर्थिक शिक्षण घेण्यास आणि तज्ज्ञांचा सल्ला घेण्यासही तयार असतात. त्यामुळे त्या अचानक निर्णय घेण्याऐवजी नियोजन करून गुंतवणूक करतात.

आता गेल्या दहा दिवसांपासून सुरु असलेल्या इराण विरुद्ध इस्रायल आणि अमेरिका या युद्धामुळे जागतिक आर्थिक घडी विस्कटलीय. त्यामुळे भारतीय बाजारात देखील चढ-उतार होत आहेत. दररोजच्या जगण्यात संकटांच्या मालिकांशी सतत सामना करणाऱ्या आजच्या स्त्री, अशा संधींचे सोने करण्याची क्षमता महिलांच्या अंगी आपसूकच वाढलेली असते.

या सर्व गुणांमुळे दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी लागणारे महत्त्वाचे गुण—संयम, शिस्त, सातत्य आणि योग्य जोखीम घेण्याची तयारी—महिलांमध्ये दिसून येतात. घरगुती बजेट हाताळण्याचा अनुभव असल्यामुळेही त्या आर्थिक बाबतीत अधिक सावध असतात. पण तरीही महिला आर्थिक बाबतीत सक्षम असूनही गुंतवणुकीचे निर्णय घेण्यात पुरुषांच्या तुलनेत मागे का आहेत असा प्रश्न उरतोच.

इंटरनॅशनल सेंटर फॉर रिसर्च ऑन विमेनच्या मते, एखादी महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम तेव्हाच मानली जाते जेव्हा तिला आर्थिक प्रगती करण्याची संधी आणि आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दोन्ही असते. महिलांकडे अनेकदा आर्थिक निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य नसते. त्यामुळे त्या गुंतवणुकीत समान प्रमाणात सहभागी होत नाहीत.

क्रिसिल आणि एम्फीच्या अभ्यासानुसार, स्वतःचा व्यवसाय करणाऱ्या ५५ टक्के महिला स्वतः आर्थिक निर्णय घेतात, तर नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये हा आकडा ३९ टक्के आहे. ज्या महिला नियमितपणे आर्थिक निर्णय घेतात त्यांना बचतीची गुंतवणूक करणे अधिक सोपे वाटते.

वयानुसार महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढते. ४५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ६५ टक्के महिला स्वतः आर्थिक व्यवहार सांभाळतात. तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील ५८ टक्के महिलांना आर्थिक निर्णय घेण्याचे अधिक स्वातंत्र्य असते.

अलीकडच्या काळात भारतातील महिलांमध्ये आर्थिक जागरूकता वाढत आहे. त्यामुळे महिलांची गुंतवणूकही वाढत आहे. मार्च २०१७ मध्ये गुंतवणूक क्षेत्रातील महिलांचा हिस्सा १५ टक्के होता, तो डिसेंबर २०२३ मध्ये जवळपास २१ टक्के झाला आहे. बी -३० शहरांमध्ये ही वाढ अधिक दिसून येते. या शहरांमध्ये महिलांचा गुंतवणुकीतील हिस्सा १७ टक्क्यांवरून २८ टक्के झाला आहे.

तरीही महिलांची गुंतवणूक प्रामुख्याने सुरक्षित पर्यायांमध्ये असते. क्रिसिल डीबीएसच्या अहवालानुसार भारतातील महिला त्यांच्या पैशांपैकी ५१ टक्के रक्कम फिक्स्ड डिपॉझिट आणि बचत खात्यांमध्ये ठेवतात. भांडवली बाजारात त्यांची गुंतवणूक सुमारे १५ टक्के आहे. जर महिलांना गुंतवणुकीचे पर्याय, जोखीम आणि परतावा यांची चांगली माहिती मिळाली, तर त्या अधिक संतुलित आणि फायदेशीर गुंतवणूक पोर्टफोलिओ तयार करू शकतात.

पुरुष आणि महिलांच्या उत्पन्नात अजूनही फरक आहे. सरासरी महिलांचे उत्पन्न पुरुषांच्या तुलनेत सुमारे १७ टक्के कमी असते. त्यामुळे आर्थिक समानता मिळवण्यासाठी महिलांना अधिक बचत करावी लागते.

जोखीम घेण्याची तयारी व्यक्तीच्या आर्थिक उद्दिष्टांवर, अनुभवांवर आणि जबाबदाऱ्यांवर अवलंबून असते. समाजात महिलांना आर्थिक बाबींचा अनुभव अनेकदा उशिरा मिळतो. त्यामुळे त्यांची गुंतवणूक सुरू करण्याची वेळही उशिरा येते.२०२४ मध्ये अमेरिकेत झालेल्या एका सर्वेक्षणानुसार ७० टक्क्यांपेक्षा जास्त महिलांनी सांगितले की त्यांनी गुंतवणूक लवकर सुरू केली असती तर अधिक चांगले झाले असते.

महिलांची सावध गुंतवणूक पद्धत दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी फायदेशीर ठरू शकते. चक्रवाढीचा फायदा त्यांनाच जास्त मिळतो जे संयम आणि सातत्य ठेवतात. हे गुण महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसतात.आर्थिक साक्षरता वाढवून आणि योग्य माहितीच्या आधारे निर्णय घेतल्यास महिला मजबूत आणि विविध गुंतवणूक पोर्टफोलिओ तयार करू शकतात. त्यामुळे आर्थिक यश मिळवण्यासाठी महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान- जग जिंकूया चा मंत्र" - श्री यशवंत गोसावी

# कॉलेज ऑफ कॉमर्स, सायन्स अँड कॉम्प्युटर एज्युकेशन महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण संपन्न




**मालेगाव (दै. संध्या) :**

शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या कॉलेज ऑफ कॉमर्स सायन्स अँड कॉम्प्युटर एज्युकेशन या महाविद्यालयामध्ये दि.१७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ (Annual Prize Distribution) मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालया मार्फत प्रथम क्रमांक चार हजार रुपये द्वितीय क्रमांक 3000 रुपये आणि तृतीय क्रमांक दोन हजार रुपये असे एकूण 1 लाख 21हजार रुपयांचे बक्षीस वितरण आजच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे श्री यशवंत गोसावी तसेच संस्थेचे विश्वस्त मा.श्री.रोहन देवकाते व अॅड.धन्यकुमार जगताप, श्री.गौरव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले.या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक,पालक तसेच मान्यवरांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षण म्हणून प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते यशवंत गोसावी यांचे "चला जग जिंकूया" या विषयावर प्रभावी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांना जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिला.आपल्या भाषणात त्यांनी आजच्या काळातील परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, भविष्यात पुढे जाताना आपल्या आजूबाजूला काय चालले आहे, विशेषतः महाराष्ट्रात काय घडत आहे,याचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.सध्याची परिस्थिती समजून घेत वास्तव स्वीकारून त्यावर चिंतन केले पाहिजे,असे त्यांनी स्पष्ट केले.ते पुढे म्हणाले की, "शिक्षणाशिवाय पर्याय नाही," आणि शिक्षण हेच व्यक्तीच्या प्रगतीचे प्रमुख साधन आहे.माणूस वयाने मोठा होत नाही,तर आपल्या कर्तृत्वाने मोठा होतो, हे त्यांनी ठळकपणे सांगितले.आयुष्याच्या गणिती समस्या योग्य वेळी सोडवणे गरजेचे आहे; कारण वेळ निघून गेल्यावर त्या सोडवणे कठीण होते, असेही त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की,आयुष्यात काय साध्य करायचे आहे याचे चिंतन करा आणि स्वतःला सतत अपडेट ठेवा.दुसऱ्याच्या सावलीत उभे राहून स्वतःची ओळख निर्माण करता येत नाही,त्यामुळे स्वबळावर पुढे जाण्याची वृत्ती जोपासा,असा संदेश त्यांनी दिला.यावेळी त्यांनी जिवंत आदर्श म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांचे उदाहरण देत त्यांच्या ध्येय, धैर्य आणि नेतृत्वगुणांमधून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. आयुष्यात मोठी स्वप्ने बघा आणि त्या स्वप्नांवर प्रेम करा; कारण उद्दिष्टावर असलेले प्रेमच आपल्याला यशाच्या दिशेने नेते,असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या संस्कृतीतील मूल्ये स्पष्ट करताना त्यांनी तीन महत्त्वाच्या पायऱ्यांचा उल्लेख केला—पंढरपूर येथील नामदेव महाराज यांची भक्ती,रायगडावरील हिरोजींची निष्ठा आणि आई-वडिलांप्रती असलेला आदर.या मूल्यांचा अंगीकार केल्यास जीवन अधिक समृद्ध होते,असे त्यांनी सांगितले. "श्रद्धा ही पुस्तकांवर असली पाहिजे," असे सांगत त्यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले. तसेच "भारतीय बना आणि आपल्या मातीसाठी जगा," असा संदेश देत त्यांनी देशप्रेमाची भावना दृढ करण्याचे आवाहन केले.आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी नमूद केले की,आयुष्यात चढ-उतार येणारच; मात्र त्या परिस्थितीत खचून न जाता पुन्हा उभे राहून पुढे जाण्याची जिद्द ठेवली पाहिजे.संघर्षातूनच यशाचा मार्ग निर्माण होतो, असा सकारात्मक संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा मिळाली.

याप्रसंगी बोलताना संस्थेचे विश्वस्त श्री.रोहन देवकाते यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे अथक परिश्रम व योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे असते ज्यांनी विद्यार्थी घडवले त्या सर्व शिक्षकांचेही त्यांनी विशेष कौतुक केले.स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने नवीन स्किल्स् आत्मसात केली पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.अजित चांदगुडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.पुष्पांजली काटे, प्रा.पूनम वाघ यांनी केले.

आभार प्रदर्शन प्रा.रुपाली मोफरकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्याकरता प्रा.संतोषी पवार,श्री.रोहन तावरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य झाले.याप्रसंगी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माळेगाव कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ.संगीताताई कोकरे,सर्व संचालक, संस्थेचे विश्वस्त अॅड.राजेंद्र काटे,अॅड.धन्यकुमार जगताप,श्री.विराज खलाटे,श्री. प्रवीण पोंदकुले,श्री.रोहन देवकाते,डॉ.मोहन नेवसे,श्री.गणपत देवकाते,सौ. आशाताई जराड,डॉ.निलेश नलावडे,प्रल्हाद वरे,गौरव जाधव संस्थेचे सचिव डॉ.धनंजय ठोंबरे यांनी अभिनंदन केले.


## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचेच नाव कायम

**बारामती (दै. संध्या) :**

बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित सर्वोपचार रुग्णालयाला उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे नाव देण्याचा निर्णय अखेर राज्य शासनाने मागे घेतला आहे. त्यामुळे आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच त्याच्याशी संलग्नित सर्वोपचार रुग्णालय या दोन्ही घटकांना पुढील काळात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' यांचेच नाव कायम राहणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्य सरकारने या शासकीय वैदयकीय महाविद्यालयाशी संलग्नित रुग्णालयास तसेच बारामतीतील आयुर्वेदीक महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयास अजितदादा पवार यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय जाहीर झाल्यानंतर मात्र या निर्णयाला विविध सामाजिक संघटनांकडून तीव्र विरोध झाला.

## ड्रीमी टेक्नॉलॉजीचा भारतात विस्तार; 'L40 अल्ट्रा AE' आणि 'D20 अल्ट्रा' रोबोटिक व्हॅक्यूम लाँच

**पुणे (दै. संध्या) :**




स्मार्ट होम इनोव्हेशनमधील जागतिक आघाडीची कंपनी 'ड्रीमी टेक्नॉलॉजी'ने आज भारतात आपल्या रोबोटिक व्हॅक्यूम पोर्टफोलिओमध्ये 'ड्रीमी L40 अल्ट्रा AE' आणि 'ड्रीमी D20 अल्ट्रा' या दोन नवीन उत्पादनांची भर टाकली आहे. आधुनिक घरांसाठी खास तयार केलेली ही उत्पादने हाय-पॉवर्ड सक्शन क्षमता, इंटेलिजेंट नेव्हिगेशन सिस्टम आणि प्रगत अडथळा टाळण्याच्या तंत्रज्ञानाचा एक उत्कृष्ट मिलाफ आहेत. याचा परिणाम म्हणजे एक अचूक आणि अत्यंत कार्यक्षम साफसफाईचा अनुभव मिळतो, ज्यामुळे तुमच्या घराचा कोपरा न कोपरा पूर्णपणे स्वच्छ होतो. भारतीय ग्राहक ज्याप्रमाणे स्मार्ट होम सोल्यूशन्सचा अवलंब करत आहेत, ते लक्षात घेऊन ड्रीमीने अधिक सोय, कार्यक्षमता आणि वैयक्तिक साफसफाईचा अनुभव देणारी नाविन्यपूर्ण उत्पादने आणली आहेत. ऑटोमेटेड मॅपिंग सिस्टम, स्मार्ट कार्पेट डिटेक्शन आणि स्वयंचलित साफसफाई व देखभालीची क्षमता असलेल्या 'मल्टीफंक्शनल डॉक्स'सह, ही नवीन उत्पादने कोणत्याही त्रासाशिवाय साफसफाईचा अनुभव देतात. या उपकरणांमध्ये ड्रीमीची वॉर्मेक्स™ सक्शन सिस्टम आणि इंटेलिजेंट मॅपिंग यांसारखी प्रगत तंत्रज्ञाने समाकलित केलेली आहेत, जी दैनंदिन साफसफाई सुलभ करतानाच वेगवेगळ्या पृष्ठभागांवर उत्कृष्ट कामगिरी सुनिश्चित करतात. १८ मार्चपासून, L40 अल्ट्रा AE आणि D20 अल्ट्रा अनुक्रमे ५९,९९९ आणि ३९,९९९ रुपयांच्या किमतीत अॅमेझॉन इंडिया आणि निवडक क्रोमा स्टोअर्सवर उपलब्ध होतील. ड्रीमी टेक्नॉलॉजी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा म्हणाले की, "भारतीय ग्राहक दैनंदिन जीवन सोपे करणाऱ्या स्मार्ट आणि उच्च-कार्यक्षमता असलेल्या सोल्यूशन्सचा वाढत्या प्रमाणात स्वीकार करत आहेत. आम्ही पाहत असलेला सर्वात मोठा बदल म्हणजे ऑल-इन-वन आणि उच्च स्वयंचलित साफसफाईच्या उपायांना मिळणारी पसंती, जे मानवी प्रयत्न कमी करून उत्कृष्ट कामगिरी देतात. L40 अल्ट्रा AE आणि D20 अल्ट्रा च्या लाँचसह, आम्ही आमचा पोर्टफोलिओ इंटेलिजेंट आणि पूर्णपणे एकात्मिक प्रणालींसह विस्तारत आहोत जे प्रगत ऑटोमेशनसह शक्तिशाली साफसफाईचा मेळ साधतात. ही सोल्यूशन्स ग्राहकांना त्यांच्या घराचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिक नियंत्रण आणि लवचिकता देतात, तसेच नाविन्यपूर्णतेद्वारे दैनंदिन जीवन अधिक सुसह्य करण्याचे आमचे ध्येय अधिक दृढ करतात."

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी दुःखाच्या क्षणी दिलेला शब्द पाळला

*महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांच्या हस्ते आसावरी जगदाळे यांना पुणे महानगरपालिकेत प्रशासकीय पदावर नियुक्ती*

**पुणे (दै. संध्या) :**



पहलगाम येथील दुर्दैवी हल्ल्यात वडिलांना गमावलेल्या आसावरी संतोष जगदाळे यांना दिलेला शब्द पाळत आज पुणे महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय पदावर नियुक्ती देण्यात आली. मा. महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांच्या हस्ते आसावरी जगदाळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी बोलताना महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या की, दुःखाच्या क्षणी दिलेले वचन मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी पाळले असून वेळोवेळी सातत्याने या प्रकरणाचा पाठपुरावा करून त्यांनी हा विषय पूर्णत्वास नेला. कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हेच शासन व प्रशासनाचे कर्तव्य आहे.

आसावरी जगदाळे यांनी बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स तसेच एमबीए शिक्षण पूर्ण केले असून त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे त्यांची पुणे महानगरपालिकेत प्रशासकीय पदावर नियुक्ती करण्यात आली. अशा गुणवंत मुलीला संधी देताना अभिमान वाटत असल्याचेही महापौरांनी सांगितले.

राज्य शासन आणि पुणे महानगरपालिका हे दोन्ही घटक संवेदनशीलपणे कार्य करत असून नागरिकांना वेळेत न्याय व मदत मिळावी यासाठी आम्ही नेहमीच कटिबद्ध आहोत. मातृभूमीसाठी प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांच्या कुटुंबाची काळजी घेणे हेच संवेदनशील प्रशासनाचे खरे स्वरूप आहे, असेही महापौरांनी नमूद केले.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीद्वारे संवाद साधून आसावरी जगदाळे यांना शुभेच्छा दिल्या तसेच कुटुंबीयांना धीर दिला.

यावेळी पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, गटनेते गणेश बिडकर, धीरज घाटे, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर व जगदाळे कुटुंबीय उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी जगदाळे कुटुंबाच्या पाठीशी पुणे महानगरपालिका कायम उभी राहील असा विश्वास व्यक्त केला.



## पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष बिनविरोध

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेत अध्यक्षपदी विरधवल कृष्णराव जगदाळे, तर उपाध्यक्षपदी विवेक (बंटी) प्रतापराव वळसे पाटील यांची बिनविरोध निवड झाली. सत्ताधारी गटाच्या एकमतामुळे ही निवड प्रक्रिया कोणताही सामना न होता शांततेत पार पडली

जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या या निवडीत अन्य कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल न केल्याने दोन्ही पदांची निवड बिनविरोध जाहीर करण्यात आली. या निवडीमुळे जिल्हा परिषदेमध्ये स्थैर्य निर्माण होणार असून विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दौंड तालुक्यातील खडकी–देऊळगावराजे गटातून निवडून आलेले विरधवल जगदाळे हे तिसऱ्यांदा जिल्हा परिषदेत प्रतिनिधित्व करत आहेत. १५,०८६ मते मिळवत त्यांनी ४,१८६ मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे. यापूर्वी त्यांनी दौंड नगरपरिषदेचे नगरसेवक व नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले असून जिल्हा परिषद सदस्य आणि जिल्हा नियोजन समिती सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. सहकार व सामाजिक क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.

उपाध्यक्षपदी निवड झालेले विवेक (बंटी) वळसे पाटील हे शिक्षणाने एम.बी.ए. असून युवक राष्ट्रवादी काँग्रेस, सहकार क्षेत्र आणि जिल्हा परिषदेत विविध पदांवर त्यांनी काम केले आहे. कृषी, शिक्षण, आरोग्य व क्रीडा क्षेत्रात त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत.

दरम्यान, निवडीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना अध्यक्ष विरधवल जगदाळे भावूक झाले. दादांच्या अनेक आठवणींना उजाळा देताना त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. "दादा माझा दादाच होता," अशी भावना व्यक्त करत त्यांनी दादांनी दिलेला संदेशही आठवला—"रडत बसायचे नाही, लढायचे," असे ते म्हणाले.

जगदाळे कुटुंबाला राजकीय वारसा लाभला असून त्यांच्या नेतृत्वाखाली दौंड परिसरात सहकार व विकासाच्या विविध उपक्रमांना चालना मिळाली आहे. दौंड शुगरसारख्या प्रकल्पांमुळे स्थानिक शेतकरी व तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

> "जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासासाठी पारदर्शक व प्रभावी काम करण्यावर भर देणार आहे."
> **- विरधवल कृष्णराव जगदाळे**
>
> "समन्वय साधून विकासकामांना गती देणे आणि नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणे हे आमचे उद्दिष्ट आहे."
> **- विवेक (बंटी) वळसे पाटील**


### महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे- ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२१७६५
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- integratedpune.ee@mahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ८४ सन २०२५-२०२६ (द्वितीय वेळ-अल्पकालावधी)**

**कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे-१ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत / अनोंदणीकृत पात्र कंत्राटदारांकडून बी-१/बी-२/क निविदा नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.**

वरील निविदा सुचनेत कामे समाविष्ठ असून या निविदा सुचनेची संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळांवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. http://mahatenders.gov.in

सही/-
(अनुराधा रा. भंडारे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
पुणे-४११००१.

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6664

### ग्रामपंचायत वाघापूर, ता. पुरंदर, जि. पुणे

**B1 नोटीस क्रमांक -१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत वाघापूर, ता. पुरंदर, जि.पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत वाघापूर ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १९/०३/२०२६ ते दिनांक २७/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा ग्रामपंचायत सोई नुसार / मासिक सभेमध्ये उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा प्रसिद्ध करण्याचा दिनांक | निवीदा फी+GST | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ. जा वस्ती येथे सभा मंडप सुधारणा करणे. | २२६४२४/- | दि. १९/०३/२०२६ ते दि.२७/०३/२०२६ | २३६/- | २२६४/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत वाघापूर PDCC बँक शाखा राजेवाडी खाते क्र ०६८००२५००००००७६ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील तसेच इसारा रक्कम ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.. सोबत निविदेच्या अटी व शर्ती देण्यात येतील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाची दाखले असल्यास जोडावेत ४) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्रझाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत वाघापूर यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत वाघापूर, ता. पुरंदर, जि. पुणे

### ग्रामपंचायत सिंगापूर, ता. पुरंदर, जि. पुणे

**B1 नोटीस क्रमांक -१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत सिंगापूर, ता. पुरंदर, जि. पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत सिंगापूर ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १९/०३/२०२६ ते दिनांक २७/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने /समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा ग्रामपंचायत सोई नुसार/ मासिक सभेमध्ये उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा प्रसिद्ध करण्याचा दिनांक | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | गाळे बांधकाम करणे. | ५९९५७१/- | दि १९/०३/२०२६ ते दि २७/०३/२०२६ | ५९०/- | ५९९६/- |
| २ | पाऊस पाणी संकलन यंत्रणा करणे. | १५००००/- | | २३६/- | १५००/- |
| ३ | सिंगापूर येथे बंदिस्त गटर करणे. | १२७०००/- | | २३६/- | १२७०/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत सिंगापूर PDCC बँक शाखा सासवड खाते क्र ००६००२५०००००१५८ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील तसेच इसारा रक्कम चा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.. सोबत निविदेच्या अटी व शर्ती देण्यात येतील (सु.बे. ला इसारा फी सुट देण्यात येत आहे.) ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाची दाखले असल्यास जोडावेत. ४) ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत सिंगापूर यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत सिंगापूर, ता. पुरंदर, जि. पुणे

### जाहीर नोटीस

तमाम नागरीकांस विशेषतः गाव मौजे गोळेगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सर्व नागरीकांना सदरच्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

आमचे आशिल यांनी खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकती संदर्भात रजाक हुसेन पठाण, शकीला अब्दुलरजाक शेख, सलामा रमजान शेख, महेमुद हाशम जमादार, मोहंमद शोएव हाशम जमादार, नसरीन शकील शेख सर्व मुळ रा. जुन्नर (गोळेगाव), ता. जुन्नर, जि. पुणे यांचेबरोबर व्यवहार केला असुन सदरची मिळकत आमचे अशिलांना विकत घ्यावयाची आहे. खाली परीशिष्ठात नमुद केलेली मिळकत रजाक हुसेन पठाण, शकीला अब्दुलरजाक शेख, सलामा रमजान शेख, महेमुद हाशम जमादार, मोहंमद शोएव हाशम जमादार, नसरीन शकील शेख सर्व मुळ रा. जुन्नर (गोळेगाव), ता. जुन्नर, जि. पुणे यांच्या मालकीची असुन, त्यांनी ते खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक असल्याची माहीती व सदरील मिळकत त्यांचे प्रत्यक्ष ताबेवहीवाटीत असल्याची माहीती आमचे अशिलांना दिली आहे. आमचे अशिल त्यांचेबरोबर सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करु इच्छित आहेत. म्हणुन इतर कोणाची फसवणुक होऊ नये म्हणुन आमचे अशिल सदरची जाहीर नोटीस मुद्दामहून प्रसिध्द करीत आहेत.

खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीसंदर्भात कोणताही करार, साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, भाडेकरार, मुखत्यारपत्र, कुलमुखत्यारपत्र वगैरे तत्सम स्वरुपाचा कोणताही तबदीलीचा व्यवहार रजाक हुसेन पठाण, शकीला अब्दुलरजाक शेख, सलामा रमजान शेख, महेमुद हाशम जमादार, मोहंमद शोएव हाशम जमादार, नसरीन शकील शेख सर्व मुळ रा. जुन्नर (गोळेगाव), ता. जुन्नर, जि. पुणे यांचेबरोबर यापूर्वी कोणी केलेला असल्यास तसेच कोणाचाही सदर मिळकतीमध्ये हक्क हितसंबंध असल्यास लेखी कागदपत्रांसह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खालील नमुद केलेल्या पत्यावर संपर्क साधुन खात्री पटवुन दयावी. सदरील वर नमुद केलेल्या मुदतीत खाली नमुद केलेल्या मिळकतीं संदर्भात कोणीही खात्री पटवुन दिली नाही अगर हरकत घेतली नाही तर आमचे अशिल रजाक हुसेन पठाण, शकीला अब्दुलरजाक शेख, सलामा रमजान शेख, महेमुद हाशम जमादार, मोहंमद शोएव हाशम जमादार, नसरीन शकील शेख सर्व मुळ रा. जुन्नर (गोळेगाव), ता. जुन्नर, जि. पुणे यांचेबरोबर व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचीही कोणतीही बाब ऐकुन घेतली जाणार नाही किंवा कोणाचाही काही हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिला आहे असे समजण्यात येईल व आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** तु. पुणे पो.तु.ता. जुन्नर, पं. स. जुन्नर, मे. सब रजि. सो. जुन्नर यांचे हद्दीतील गांव मौजे गोळेगाव येथील मिळकत.

| ग. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| ३७/२ | १.७५ | ३.४४ |

यापैकी समाईकातील अविभक्त ० हे. १७.१५ आर. क्षेत्र

येणेप्रमाणे वर्णनाची बागायत शेतजमीन त्यातील तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह तसेच सदर मिळकतीतील विहिरीतील भाऊ हिश्यासह तसेच विहिरीवरील विज कनेक्शन, डी.पी. व पाईप लाईनमधील भाऊ हिश्यासह व सर्व इजमेंटरी राईटसह दरोबस्त मिळकत.

**येणेप्रमाणे नोटीस**
**दि. १८/०३/२०२६**

सही/-
प्रफुल्ल रा. लुंकड
बी. कॉम्., एलएल्.बी. अॅडव्होकेट
ऑफीस : ५१, "इंदिरा प्लाझा" शंकरपुरा पेठ, जुन्नर (पुणे) ४१०५०२.
निवास : ७७, सराई पेठ, जुन्नर (पुणे) ४१०५०२.
मोबाईल नं.: ९८८१६६६९९०/७५८८१८३६६६

### ग्रामपंचायत भोसलेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र. १ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत भोसलेवाडी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत भोसलेवाडी ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १९/०३/२०२६ ते दिनांक २६/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा फी | इसारा रक्कम | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोसलेवाडी अंतर्गत बंदिस्त गटर करणे १. | १६७६७१/- | २३६/- | १६७७/- | खुला |
| २ | भोसलेवाडी अंतर्गत बंदिस्त गटर करणे २. | १२३५९६/- | २३६/- | १२३६/- | खुला |
| ३ | भोसलेवाडी अंतर्गत सिमेंट रस्ता करणे. | २९९६३३/- | २३६/- | २९९६/- | खुला |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत भोसलेवाडी PDCC बँक शाखा जेजुरी खाते क्र. २५/५२ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत भोसलेवाडी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत भोसलेवाडी ता. पुरंदर जि. पुणे

# पत्रकारिता संपली तर समाज संपेल - ज्येष्ठ राजकीय विश्लेषक हेमंत देसाई

## चुका निदर्शनास आणून द्या - महापौर रवी लांडगे

## हेवा वाटावा असे पुरस्कारार्थी - विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर

**पिंपरी (दै. संध्या) :**

पत्रकारिता आणि साहित्याचा जवळचा संबंध आहे. पत्रकारांनी वेगवेगळ्या क्षेत्रात रस निर्माण करून काम करावे. त्यामुळे लिखाण व्यापक, फुलेल आणि बहुअंगी होईल. पत्रकारांनी प्रचंड वाचन केले पाहिजे. मोजके आणि सकस लिहिले पाहिजे. वाटेल ते लिहू नये. चुकीवर प्रहार करावा आणि चांगल्याला चांगले म्हणावे, त्याचे कौतुक करावे. पत्रकारांनी भूमिका घेतली पाहिजे. पत्रकारिता संपली, तर समाज संपेल, असे मत ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. हेमंत देसाई यांनी व्यक्त केले. पत्रकारांना वेगळी नजर असली पाहिजे आणि ते टिपून छापता आले पाहिजे, असेही ते म्हणाले.

अखिल मराठी पत्रकार संस्था महाराष्ट्र राज्य संलग्न पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघ आयोजित "पीसीएमसी टॉप १० पुरस्कार २०२६" वितरण सोहळा गुरुवारी खराळवाडी, पिंपरी येथे पार पडला. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या




दहा जणांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी डॉ. देसाई बोलत होते. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. राज्यस्तरीय दिवाळी अंकाच्या स्पर्धेचे बक्षीस वितरणही यावेळी करण्यात आले. प्रथम क्रमांक वल्ड सामना, दुसरा थिंक पॉझिटिव्ह, तिसरा गावगाथा आणि चौथ्या क्रमांक आनंद तरंग या दिवाळी अंकाला देण्यात आला. महापौर रवी लांडगे, उपमहापौर शैलजा मोरे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, पत्रकार संघाचे संस्थापक बापूसाहेब गोरे, अध्यक्षा सायली कुलकर्णी, माजी महापौर योगेश बहल, उद्योजक कृष्णकुमार गोयल, महापालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, क्रीडा समिती सभापती कैलास कुटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, नगरसेवक शेखर चिंचवडे, नगरसेविका अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अधिकारी हरविंदर बन्सल, सुनील पवार, विजय भोजने, महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यावेळी उपस्थित होते.

प्रसिद्ध व्याख्यात्या शारदाताई मुंडे, अशोक बेलापूरकर, जेष्ठ पत्रकार बाळासाहेब ढसाळ, पाचंगे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. डॉ. देसाई म्हणाले, "आजघडीला पत्रकारिता नीचांकाला पोहोचली आहे. कोण आमदार मंगलअष्टिका म्हटला याच्या बातम्या केल्या जातात. एवढे फालतुकरण पत्रकारितेचे झाले आहे. एक प्रवक्ते सकाळी बोलतात आणि सत्ताधारी पक्षाचा प्रवक्ता त्याला उत्तर देतो. आपण कोणाबद्दल बोलतो, आपले वय, भान याचा विचार केला जात नाही. आजमितीला पत्रकारांना निर्भीडपणे लिहिता येत नाही. लिहिले तर छापले जात नाही. छापण्याचा आग्रह केला तर नोकरी जाण्याची भीती आहे.

भारतातील मीडिया कॉर्पोरेट झाला आहे. उद्योजकांचे न्यूज चॅनेल असून त्यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. त्यांचे हितसंबंध जोपासण्यासाठी बातम्या दिल्या जातात. अनेक चॅनेल सरकारची भलामण करतात. मीडियावर सरकारचे प्रभुत्व आहे. समाजात तेढ निर्माण होईल असे मंत्रीपदांवरील व्यक्ती भाष्य करतात. दुर्दैवाने मिडियातून त्याला प्रसिद्धी दिली जाते. आक्षेपार्ह गोष्टी दाखवू नये यावर आता जनतेने आवाज उठवला पाहिजे. जनतेशी निगडित प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यासाठी धार्मिक मुद्दे समोर आणले जातात".

पत्रकारांच्या समस्यांबाबत कोणीही उहापोह करीत नाही. त्यांच्या समस्येकडे पदाधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी अपेक्षा संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गोरे यांनी प्रास्ताविकात केली. अक्षय मोरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डिजीटल मिडीया अध्यक्ष अमोल डंबाळे, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील (बाबू कांबळे), उपाध्यक्ष विनय लोंढे, रेहान सय्यद, चिटणीस संतोष जराड, कोषाध्यक्ष गणेश शिंदे, प्रसिद्धीप्रमुख युनुस खतिब, सरचिटणीस मुकेश जाधव, कार्यकारिणी सदस्य प्रसाद बोरसे, जितेंद्र गवळी, अशोक लोखंडे, शबनम सय्यद, अमोल डंबाळे, विश्वास शिंदे यांनी परिश्रम घेतले.

"मी मस्तवणार नाही. आमच्याकडून चुका झाल्यास पत्रकारांनी आवश्य निदर्शनास आणून द्याव्यात. त्यात सुधारण केल्या जातील. तसेच चांगल्या कामाचेही कौतुक करावे. प्रोत्साहन द्यावे. पत्रकार सर्व क्षेत्रात चांगले काम करतात. पुण्याप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातही अराजकीय क्लब सुरू करावा. त्यातून गेट टुगेदरच्या माध्यमातून सर्व गोष्टींवर साधक बाधक चर्चा होईल", असे महापौर रवी लांडगे म्हणाले.


"गुणवतांचा शोध घेऊन त्यांचा सन्मान करणे हे कौतुकास्पद आहे. सर्व पुरस्कारार्थी आपल्या क्षेत्रातील कर्तृत्वान आहेत. हा पुरस्कार शेवट नसून नव्या जबाबदारीची सुरुवात आहे. पत्रकारिता हा स्तंभ चवळवळीतून निर्माण झाला आहे. शहरातील पत्रकारांनी अन्यायाला लेखणीतून वाचा फोडली आहे. चुकीच्या कामावर प्रहार आणि चांगल्या कामाचे कौतुक केले आहे. साहित्य आणि संस्कृती टिकली तरच समाज टिकेल. युवा महापौर असल्याने पिंपर चिंचवडचे भविष्य सुरक्षित हाती आहे. माझी जन्मभूमी पुणे असली तर कर्मभूमी पिंपरी चिंचवड आहे. शहराची औद्योगिकनगरी बरोबर आता सांस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक नगरी अशी नवीन ओळख होऊ लागली आहे असे उद्योजक कृष्णकुमार गोयल म्हणाले.

"अनेक पुरस्कार मॅनेज केले जातात. पुरस्कारामुळे तिरस्कार निर्माण होईल असे पुरस्काराचे पेव काही दिवसांपूर्वी उठले होते. पत्रकार संघाने कोणालाही हेवा वाटावा असे पुरस्कारार्थी निवडले आहेत", असे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले.

"पत्रकारांची मुस्कटदाबी सुरू आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष फुटून चार वर्षे झाली, पण निकाल लागत नाही. न्यायपालिकेची ही अवस्था आहे. संसदीय लोकशाहीचीही वाईट परिस्थिती आहे. महापालिका प्रशासन अतिशय भ्रष्ट आहे. मागील चार वर्षांत महापालिका तिजोरी खाली केली आहे. पत्रकारांनी याचा जाब विचारून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. पत्रकारिता जगवायची की मारायची याचा जनतेने विचार केला पाहिजे", असे पुरस्कारार्थींच्या वतीने बोलताना ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर म्हणाले.

पत्रकारिता अविनाश चिलेकर, शासकीय अधिकारी मकरंद निकम, कामगार नेते शशिकांत उर्फ बबन झिंजुर्डे, शैक्षणिक क्षेत्र प्रशांत पाटील, आर्किटेक्ट दीपक पाटील, वैद्यकीय क्षेत्र डॉ. राजेंद्र फिरके, सामाजिक क्षेत्र हणमंत माळी, रमेश वाघेरे, छायाचित्रकार नरेश नातू, क्रीडा क्षेत्र मनीषा राठोड यांना "पीसीएमसी टॉप १०" पुरस्काराने गौरविण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रम

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरीतील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीच्या सदस्या मा. प्रा. डॉ. जयश्री मगदूम या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. पांडुरंग भोसले होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. जयश्री मगदूम यांनी लक्ष्मीबाई पाटील यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलू उलगडून सांगितले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यात लक्ष्मीबाई पाटील यांनी दिलेल्या खंबीर साथीस विशेष अधोरेखित करत, त्यांच्या योगदानाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्यागमय जीवनाचा उल्लेख करत, त्यांनी संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांच्या हितासाठी समर्पित केल्याचे सांगितले. या कार्यक्रमास विज्ञान शाखेच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. संगीता अहिवळे, कला शाखेच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. कामयानी सुर्वे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. सुहास निंबाळकर, बी.व्होक मास कम्युनिकेशनचे नोडल अधिकारी डॉ. दत्तात्रय हिंगणे, तसेच प्रा. स्वप्ना हजारे, डॉ. शुभदा लोंढे, डॉ. निळकंठ डहाळे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.




### खंडणीसाठी अपहरण व कोयत्याच्या धाकाने जबरी चोरी करणारे दोन सराईत चोरटे जेरबंद

पिंपरी (दैनिक संध्या) : खंडणीसाठी अपहरण करून तसेच कोयत्याचा धाक दाखवत जबरी चोरी करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात दहशत माजवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पवन छगन उजगरे आणि सुमित हनुमंत कराड अशी आहेत. पोलिसांनी केलेल्या कारवाईत आरोपींकडून दोन रिक्षा, दोन कोयते, मोबाईल फोन तसेच काही रोख रक्कम असा एकूण ५ लाख १६ हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपींना अटक केल्यानंतर भोसरी आणि सांगवी पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या अनेक गुन्ह्यांची उकल झाली असून, आरोपींनी आणखी काही गुन्ह्यांची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सदरची कारवाई खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, पोलीस उपनिरीक्षक सुनिल भदाणे, पोलीस उपनिरीक्षक अमर राऊत, सहायक पोलीस निरीक्षक सुनिल कानगुडे, पोलीस अंमलदार प्रदीप गोडांबे, विजय नलगे, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, चंद्रकांत जाधव, किशोर कांबळे, दादाभाऊ साबळे, भरत गाडे यांचे पथकाने केली आहे.

# आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली मुख्य प्रशासकीय भवनातील विभागांची सखोल पाहणी

## कार्यालयीन शिस्त, विभागातील स्वच्छता आणि पारदर्शक कामकाजावर भर देण्याच्या दिल्या सूचना

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील विविध विभागांना भेट देत कामकाजाची सखोल पाहणी केली. या पाहणीदरम्यान प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या.

या पाहणी दरम्यान त्यांचे समवेत उप संचालक किशोर



गोखले, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता सुनील भागवानी, बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, उप आयुक्त राजेश आगळे, सचिन पवार, चेतना केरुरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी प्रत्येक विभागातील दैनंदिन कामकाज, प्रलंबित विषय, नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी व त्यावर करण्यात येणारी कार्यवाही याबाबत सविस्तर माहिती घेतली. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधत कामातील अडचणी, आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा यांचा आढावा घेतला. प्रशासनातील कामकाज अधिक सुटसुटीत आणि गतिमान करण्यासाठी विभागीय पातळीवर समन्वय वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी त्यांनी विभागांची अंतर्गत रचना, बैठक व्यवस्था आणि कार्यालयीन परिसराची स्वच्छता यावर विशेष भर दिला. कार्यालयीन जागा अधिक सुव्यवस्थित, स्वच्छ आणि कामकाजास पूरक राहील, यासाठी जुन्या फाईल्स व अनावश्यक कागदपत्रांचे गठ्ठे तत्काळ हटविण्याच्या सूचना त्यांनी केल्या. डिजिटल पद्धतींचा अधिकाधिक वापर करून कागदविरहित कामकाज वाढविण्यावर भर दिला.

कर्मचाऱ्यांसाठी सकारात्मक आणि प्रेरणादायी कार्यपरिसर निर्माण करणे तसेच नागरिकांना कार्यालयात येताना सुलभ आणि विश्वासार्ह सेवा अनुभव मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. याशिवाय कार्यालयीन वातावरण सुधारल्यास कामकाजाची गुणवत्ता वाढते आणि त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या समाधानावर होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिस्तबद्ध आणि वेळेवर कामकाज होण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. यासोबतच, पुढील पंधरा दिवसांनी पुन्हा एकदा सर्व विभागांची पाहणी करून दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी झाल्याबाबत खातरजमा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पाहणीनंतर महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांची देखील लवकरच पाहणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.




### आंतरमहाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाचा यशस्वी समारोप

**पिंपरी (दै. संध्या) :**

IIEBM Indus Business School, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या “रणभूमी २०२६” या भव्य आंतरमहाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाचा यशस्वी समारोप उत्साहात पार पडला. क्रीडास्पर्धा, रणनीती आणि जिद्दीचा उत्कृष्ट संगम या स्पर्धेत पाहायला मिळाला. IIEBM इंडस बिझनेस स्कूलद्वारे आयोजित या तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाला KTM, Triumph (बी. यू. भंडारी) आणि Satyam Corporate Caterers यांचे विशेष सहकार्य लाभले. एकूण २४ प्रायोजकांनी या स्पर्धेला पाठिंबा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली परंपरेचा तसेच मराठ्यांनी उभारलेल्या आणि जिंकलेल्या किल्ल्यांच्या इतिहासाचा रणभूमी दरम्यान उत्सव साजरा करण्यात आला. हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्याचा आणि त्यांच्या परंपरेला पुढे नेण्याचा एक प्रयत्न होता. सामर्थ्य, कौशल्य आणि रणनीती यांचा क्रीडामाध्यमातून सराव करून ही परंपरा जपण्याचा संदेश देण्यात आला. नगरसेवक राहुल कलाटे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या आयुष्यात क्रीडेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे नमूद केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची परंपरा जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवली गेली पाहिजे, यावर त्यांनी विशेष भर दिला. यावेळी व्यवस्थापकीय संचालक डॉ.जयसिंग मारवाह, अधिष्ठाता डॉ.पूनम निकम, संचालक प्रशासन कर्नल रविंद्र कुमार, संचालक राजीव सिंग, क्रीडा समिती प्रमुख, प्रा.सदानंद पेटकर, सर्व शिक्षक आणि शिक्षिकेतर कर्मचारी विध्यार्थी यांनी सहभाग घेतला.

# देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डातील समस्या सोडवण्यासाठी निधी द्या

**पिंपरी (दै. संध्या) :**

■ खासदार श्रीरंग बारणे यांची संरक्षण विभागाकडे मागणी

मावळ लोकसभा मतदारसंघातील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील विविध विकास कामे निधीअभावी रखडली आहेत. पिण्याचे पाणी, रस्ते, स्वच्छतेचा अभाव आहे. असुविधांनी नागरिक त्रस्त आहेत. त्यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाला निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिल्लीत संरक्षण विभागाच्या महानिदेशक शोभा गुप्ता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खासदार बारणे यांनी महानिदेशक गुप्ता यांची भेट घेऊन देहूरोडमधील रखडलेल्या कामांची सविस्तर माहिती दिली. मावळ लोकसभा मतदारसंघात देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा समावेश आहे. मूलभूत सुविधांचा अभाव आहे. रस्ते, स्ट्रीट लाईट (पथदिवे), पिण्याचे पाणी, प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना आणि सार्वजनिक स्वच्छतागृहांची निर्मिती करणे आवश्यक आहे. भविष्यातील पाणी संकट लक्षात



### पालखी मार्गाचे चौपदरीकरण

श्री क्षेत्र देहूगाव ते देहूरोडपर्यंत पालखी मार्गाचे चौपदरीकरण करणे आवश्यक आहे. श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात लाखो वारकरी सहभागी होतात. अरुंद मार्ग असल्याने वारकऱ्यांना चालताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यासाठी पालखी मार्गाचे चौपदरीकरण करावे. सेंट्रल चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल उभारण्याची गरज आहे. येथील बस स्थानकावर शेल्टर निर्माण करण्याची आवश्यकता आहे. याबाबत संबंधितांना निर्देश देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली.

घेऊन सद्यस्थितीतील पाणी वितरण प्रणाली, साठवण क्षमता सक्षम करणे आवश्यक आहे. नवीन जलवाहिनी टाकण्याची आवश्यकता आहे. बोर्डाच्या हद्दीतील काही गावांमध्ये जाण्यासाठी रस्ते नाहीत. कच्चे रस्ते आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण, आरोग्य सुविधांचा लाभ घेण्यासाठी येताना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे पक्के रस्ते तयार करण्याची आवश्यकता आहे. बोर्डाने २०२३ मध्येच दक्षिण कमांडकडे रस्ता निर्माण करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. शीतळानगर येथील श्रीराम मंदिर परिसरात उद्यान, योग आणि ध्यान केंद्र, वॉकिंग ट्रॅक, गोशाळा, आणि सांस्कृतिक सभागृह उभारावे.

लहान मुले व युवकांसाठी धावपट्टी (रनिंग ट्रॅक), तसेच व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, क्रिकेट आदी खेळांसाठी मैदान विकसित करावे.देहूरोड बाजारपेठेत छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारण्यास मान्यता द्यावी. स्वर्गीय मीनाताई ठाकरे उद्यान विकसित करावे. शेलारवाडी येथील अमरजाई देवी पालखी मार्गावर स्वागत कमान उभारावी आणि तिला गावातील अध्यात्मिक क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते नबाजी भाऊगुजे शेलार यांचे नाव द्यावे. शेलारवाडी येथे श्री स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात विज्ञान प्रयोगशाळा सुरु करावी. बोर्डातील पाणीपुरवठा, शिक्षण, स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन देण्याचे आदेश देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली.

# आयटी कर्मचाऱ्यांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र ‘ट्रिब्युनल’- आमदार शंकर जगताप

## पुणे-पिंपरीच्या आयटी हबसाठी ‘ट्रिब्युनल’चे सुरक्षा कवच

**पिंपरी (दै. संध्या) :**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही शहरे जागतिक स्तरावर ‘आयटी हब’ म्हणून ओळखली जातात. मात्र, याच क्षेत्रात काम करणाऱ्या आयटी अभियंत्यांची होणारी आर्थिक फसवणूक आणि कंपन्यांकडून घेतले जाणारे सक्तीचे राजीनामे यांसारख्या गंभीर समस्यांवर आता राज्य सरकार ठोस पावले उचलत आहे. आयटी कर्मचाऱ्यांच्या तक्रार निवारणासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लवकरच नवीन संहिता आणि स्वतंत्र ‘आयटी ट्रिब्युनल’ (न्यायाधिकरण) स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आमदार शंकर जगताप यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे मांडलेल्या प्रश्नावर दिली. आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे (क्र. १७४२) आयटी क्षेत्रातील ज्वलंत प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. हिंजवडी आयटी पार्कमध्ये एका ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमार्फत १,००० हून अधिक फ्रेशर्स पदवीधरांची सुमारे २ लाख रुपये घेऊन फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार, मोठ्या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना दबाव टाकून राजीनामा देण्यास भाग पाडणे, आर्थिक पॅकेज न देता कामावरून काढून टाकणे आणि पीएफ तफावत यांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी आमदार म्हणाले महाराष्ट्रातील आयटी कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र ‘आयटी ट्रीब्युनल’ स्थापन करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. सध्या आयटी कर्मचारी प्रामुख्याने कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय यांच्याकडे दाद मागतात. यावर अनेकदा कायदेशीर पेच निर्माण होतो. आयटी क्षेत्रातील कामाचे स्वरूप वेगळे असल्याने सामान्य कामगार न्यायालयातील प्रक्रिया अत्यंत संथ आणि गुंतागुंतीची वाटते. वेळीच त्यांना न्याय मिळत नसल्याचे आमदार जगताप म्हणाले.

आमदार शंकर जगताप यांच्या प्रश्नाला उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले की, आयटी क्षेत्रातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून नवीन संहिता आणि कोर्ट स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. “औद्योगिक संबंध संहिता २०२० अंतर्गत नवीन कोर्ट अंतिम करण्याची कार्यवाही केंद्र स्तरावर सुरू आहे. केंद्राच्या गाईडलाईन्स प्राप्त होताच राज्य सरकार तातडीने या कायद्याचा ड्राफ्ट तयार करून ट्रिब्युनलची स्थापना करेल,” असे त्यांनी स्पष्ट केले.आयटी कर्मचाऱ्यांना कामगार संज्ञेच्या स्पष्ट व्याख्येत आणून त्यांना कायद्याचे कवच देण्याचा प्रयत्न केला जाईल.


आमदार शंकर जगताप सभागृहात म्हणाले, आयटीयन्सला कायद्यांच्या संरक्षणात्मक कक्षेत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या करून कामाचे तास, फुल अँड फायनल सेटलमेंट, आणि पीएफ पालन यांवर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे . कामाचे तास वाढवले जात असताना औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत कामगार संज्ञेची आयटी क्षेत्रासाठी स्पष्ट व्याख्या नसल्याने आयटी कर्मचारी अजूनही अनेक संरक्षणात्मक कायदेशीर चौकटींच्या बाहेर आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### AI शिक्षण उपक्रमाची सुरुवात; विद्यार्थ्यांना व शिक्षकांना सज्ज करण्याचा निर्धार

नाझरे सुपे (दैनिक संध्या) : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय, शिक्षण आणि सक्षमीकरण या विचारांना केंद्रस्थानी ठेवत जिल्हा परिषदेकडून पुढील वर्षात विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. योजना क्रमांक ०१ अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आत्मसात करण्यावर भर देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना भविष्यातील तंत्रज्ञानासाठी तयार करण्यासाठी AI परिचय, चॅटबॉट्स, इमेज जनरेशन आणि डेटा सायन्स यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण दिले जाईल. केवळ सैद्धांतिक शिक्षणावर न थांबता प्रत्यक्ष समस्यांवर आधारित (प्रॉब्लेम सॉल्विंग) शिक्षण दिले जाईल. AI वापरातील नैतिक जबाबदारी आणि सुरक्षिततेवरही विशेष भर दिला जाणार आहे. दर आठवड्याला हँड्स-ऑन सत्रांचे आयोजन केले जाईल. शिक्षकांना दैनंदिन कामात AI साधनांचा वापर करण्याचे व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाईल, ज्यामुळे धड्यांचे नियोजन, अध्यापन साहित्य तयार करणे आणि विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण यासाठी लागणारा वेळ कमी होईल. तसेच विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार आहे. भविष्यातील रोजगाराच्या दृष्टीने AI शिक्षण आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.



### स्वामी चिंचोलीमध्ये होणार श्रीराम जन्म सोहळा

भिगवण (दैनिक संध्या) : स्वामी चिंचोली (ता.दौंड) येथील श्रीराम मंदिर, येथे श्रीरामनवमीच्या निमित्ताने दुपारी १२.३० वाजता श्रीरामजन्म सोहळा संपन्न होणार असून त्यानंतर सर्व भक्तांसाठी प्रसाद वाटप करण्यात येणार असल्याचे श्रीरामचंद्र देवस्थान व श्रीराम जानकी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले आहे. याच दिवशी विशेष पवमान अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे. अभिषेकासाठी इच्छुकानी ट्रस्ट कडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावर्षी रामनवमी निमित्त आयोजित कीर्तन मोहना नातू यांच्या सुश्राव्य कीर्तनाने संपन्न होणार आहे. श्रीराम नवमीनिमित्त मंदिरात दुपारी १२.३० ते ४.३० या वेळेत सर्व रामभक्तांनी प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ज्येष्ठ समर्थभक्त मोहनबुवा रामदासी हे मंदिराचा इतिहास आणि सुरू असलेल्या जीर्णोद्धार कार्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. त्याचप्रमाणे येणाऱ्या वर्षात मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या पहिल्या टप्प्यात मंदिराचे शिखर (कळस) दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात येत असून त्यासाठी अंदाजे ₹२५ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. या पवित्र कार्यासाठी सर्व रामभक्तांनी पुढे येऊन आपल्या परीनं आर्थिक हातभार लावावा, असे श्रीरामचंद्र देवस्थानच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.



### वत्सला जगताप यांचे निधन

सासवड (दैनिक संध्या) : सासवड (ता.पुरंदर) येथील रहिवासी वत्सला (जिजी) काळूराम जगताप (वय ८२ वर्षे) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दिवंगत माजी सैनिक काळूराम सखाराम जगताप यांच्या त्या पत्नी तर सासवड येथील केबल व्यवसायिक कल्याण जगताप आणि सासवड नगरपरीषदेचे विद्यमान गटनेते व माजी उपनगराध्यक्ष अजित जगताप यांच्या त्या मातोश्री होत्या.



### जागतिक सर्पदंश व विषबाधा तज्ञ डॉ. राऊत दांपत्यांना पुरस्कार प्रदान

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील जागतिक सर्पदंश व विषबाधा तज्ञ डॉ.सदानंद राऊत सर व त्यांच्या पत्नी डॉ.पल्लवी राऊत मॅडम यांनी ग्रामीण आरोग्यसेवेत कलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सीताराम जयपुरिया फाउंडेशन, नवी दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणारा ग्रामीण वैद्यक आणि आरोग्यसेवा क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्वासाठीचा देशपातळीवरील "सीताराम जयपुरिया फाउंडेशन पुरस्कार २०२६" मिळाला आहे. डॉ.राऊत दाम्पत्य गेली ४० वर्षे उत्तर पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण व आदिवासी भागात समर्पितपणे वैद्यकीय सेवा देत आहे. नारायणगाव येथे १९९० पासून सेवा देत असलेल्या या दाम्पत्याने ग्रामीण भागात १९९६ साली अतिशय प्रतिकूल परिस्थितीत प्रथमच अतिदक्षता विभाग (ICU) सुरू करून हजारो रुग्णांना जीवदान दिले. त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा आरोग्यरत्न, शिवनेरभूषण व इतर अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. नुकतेच दिल्ली येथे सीताराम जयपुरिया फाउंडेशनच्या राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांना पुरस्कार स्वरूपात मिळालेले ५ लाख रुपये, ते समाजाप्रती असलेली आपली सामाजिक बांधिलकी जपत, सर्पदंश जनजागृती व शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी त्याचा विनियोग करणार आहेत.

### आरटीओकडून नवीन रिक्षा परवाना बंद

बारामती (दैनिक संध्या) : बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील बारामती, दौंड आणि इंदापूर या तीनही तालुक्यांमध्ये नव्या रिक्षा (प्रवासी) परवान्यांच्या वितरणाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाअंतर्गत तीनही तालुक्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे निरीक्षण नोंदवण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत आपला अहवाल शासनाकडे सादर केला होता. अहवालानुसार, या तीनही तालुक्यांमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या रिक्षा परवान्यांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नवीन परवाने देण्याची आवश्यकता सध्या भासत नसल्याचे अधिकाऱ्यांचे मत आहे. विशेषतः शहर व उपनगर भागात रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने वाहतुकीवर ताण निर्माण होत असून, रस्त्यांवर गर्दीची समस्या अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर, वाहतूक व्यवस्थापन सुरळीत ठेवण्यासाठी आणि रस्त्यांवरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. परिस्थितीचा नियमित आढावा घेऊन भविष्यात आवश्यकतेनुसार निर्णयात बदलाची माहिती वरिष्ठांना दिली जाईल, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी सांगितले.

# जिल्हा परिषद पुणेचा अर्थसंकल्प जाहीर

**२०२६-२७ साठी ₹३०१ कोटींचा आराखडा**

नाझरे सुपे (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषदेकडून सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी ₹455 कोटींचा अंतिम सुधारित अंदाजपत्रक आणि सन 2026-27 साठी ₹301 कोटींचा मूळ अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेचा कार्यकाळ 20 मार्च 2022 रोजी संपल्यानंतर 21 मार्च 2022 पासून प्रशासकीय व्यवस्था लागू करण्यात आली असून, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे अर्थसंकल्प मंजुरीचे अधिकार आहेत. त्यानुसार 17 मार्च 2026 रोजी हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार, मागील वर्षाच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात सुमारे ₹9 कोटींची वाढ नोंदविण्यात आली आहे. उत्पन्नाच्या बाबतीत मुद्रांक शुल्क, विविध अनुदान व इतर महसुली स्त्रोतांमधून वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे उपलब्ध निधी



वाढल्याने विविध विकासकामांसाठी तरतूद करण्यात आली आहे.

तक्त्यातील तपशीलानुसार, 2025-26 च्या सुधारित अंदाजपत्रकात विविध निधी, अनुदान, कर व इतर उत्पन्नाचे स्रोत विचारात घेण्यात आले असून, त्यानुसार खर्चाचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे 2026-27 साठीच्या मूळ अंदाजपत्रकात अपेक्षित उत्पन्न व खर्च यांचे संतुलन राखत निधीचे वाटप करण्यात आले आहे. पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरही निधी वितरणाचे नियोजन करण्यात आले असून, विविध कलमांनुसार निधीची तरतूद करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेकडून विकासकामे, पायाभूत सुविधा, तसेच ग्रामीण भागातील सेवा सुधारण्यासाठी या अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध होणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. एकूणच, उत्पन्नवाढीच्या अपेक्षेवर आधारित आणि खर्चाचे संतुलन राखणारा हा अर्थसंकल्प असल्याचे स्पष्ट होते.

"मुद्रांक शुल्क व विविध अनुदानातून उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन 2026-27 चा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे."

## पुरंदरचे सुपुत्र जिल्हाधिकारी अशोक काकडे यांचा महाराष्ट्र भुषण पुरस्काराने सन्मान

नीरा (दै. संध्या)

सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा पुरंदर तालुक्याचे सुपुत्र अशोक काकडे यांना त्यांच्या शासकीय सेवेत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण 2025 या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. काकडे हे पुरंदर तालुक्यातील पांगारे गावाचे सुपुत्र आहेत. मुंबई येथे झालेल्या भव्य समारंभात राज्याचे मंत्री मंगलप्रसाद लोढा, आयुष्मान भारतचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे तसेच संदीप काळे यांच्या हस्ते अशोक काकडे आणि त्यांच्या पत्नी शरदिनी काकडे यांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र शासन, आयुष्मान भारत आणि व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने हा



पुरस्कार प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक व घरकाम करणाऱ्या महिलांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन, तसेच गंभीर आजारांनी ग्रस्त महिलांसाठी खाजगी रुग्णालयांत मोफत शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्याचा त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या या समाजोपयोगी कार्याची दखल घेऊनच त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. दरम्यान, पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर अशोक काकडे यांनी आपल्या मूळ येत व मामाच्या गावी दौंडज येथे जाऊन मामांचे – दामोदर कदम यांचे आशीर्वाद घेतले. आपल्या यशामागे कुटुंबीयांचे व मामा दामोदर कदम यांचे पाठबळ असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. अशोक काकडे यांच्या या यशामुळे पुरंदर तालुक्यासह संपूर्ण सांगली जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कासारीतील पाझर तलावात 'चासकमान'चे पाणी सोडा

तळेगाव ढमढेरे (दै. संध्या)

कासारी (ता. शिरूर) येथील शासकीय तलाव व वसुमळा येथील पाझर तलावात चासकमान धरणाचे पाणी त्वरित सोडून पाणी टंचाई कमी करावी, अशी मागणी ग्रामपंचायतीतर्फे करण्यात आली आहे. शिक्रापूर येथील 'चासकमान'चे अधिकारी प्रज्ञा जगताप यांना कासारी येथे चासकमानचे पाणी सोडण्याची मागणी निवेदनाद्वारे मंगळवारी (ता.१७) करण्यात आली. पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ सासवडे यांनी जगताप यांना निवेदन दिले. यावेळी प्रगतशील शेतकरी संतोष काकडे, सामाजिक कार्यकर्ते गणेश सातपुते, युवराज मांढरे, विजय लोखंडे व ग्रामस्थ उपस्थित होते. कासारी येथे चारी क्रमांक १२ व १३ मधून चासकमानचे पाणी शासकीय तलाव आणि वसूमळा येथील पाझर तलावात त्वरित सोडावे. चासकमानच्या पाण्यावर ग्रामस्थांना पाणीपुरवठा अवलंबून आहे. येथील दोन्ही तलाव कोरडे ठणठणीत पडल्याने तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. येथील तलावात चासकमानचे पाणी त्वरित सोडावे अन्यत: ग्रामस्थांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागेल असे ग्रामपंचायतचे प्रशासक व्ही. एम. पवार यांनी निवेदनात म्हटले आहे.

## वळसे पाटील कुटुंबाची परंपरा कायम, उपाध्यक्षपदी दुसऱ्यांदा विवेक वळसे पाटील

मंचर (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषदेत अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांच्या निवडीत यंदा मोठी चुरस असतानाही आंबेगाव तालुक्याला पुन्हा एकदा मानाचे स्थान मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. वळसे पाटील कुटुंबाची जिल्हा परिषदेत नेतृत्वाची परंपरा यानिमित्ताने अधोरेखित झाली आहे. आंबेगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा माजी जिल्हा परिषद सदस्य (स्व.) दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील यांची तब्बल ४७ वर्षांपूर्वी (सन १९७९) पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीच्या सभापतीपदी निवड झाली होती. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत नातू विवेक प्रतापराव वळसे पाटील यांना जिल्हा परिषद उपाध्यक्षपदाची दोन वेळा संधी मिळाली आहे. यंदाच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीत अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्या मतदारसंघाला प्रतिनिधित्व मिळावे यासाठी जोरदार प्रयत्न केले होते. मात्र माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या राजकीय रणनीतीमुळे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पाठबळामुळे आंबेगाव तालुक्याला पुन्हा झुकते माप मिळाल्याची चर्चा सुरू आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार व माजी उपमुख्यमंत्री (स्व.) अजित पवार यांच्या प्रमाणेच बारामतीचे आंबेगाववरील प्रेम अधोरेखित झाल्याचे बोलले जात आहे.

## आळंदीतील श्री ज्ञानेश्वर विद्यालय खेड तालुक्यात प्रथम

*शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानात ८१.६७ टक्के गुणांसह अव्वल कामगिरी*

आळंदी (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग आणि जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान 2025-26' अंतर्गत आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजने खेड तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

इयत्ता पाचवी ते बारावी या गटामध्ये विद्यालयाने 81.67 टक्के गुण मिळवत ही उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. या यशामुळे



विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा, प्रभावी अध्यापन पद्धतीचा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा ठसा उमटला आहे.

सदर अभियानांतर्गत जिल्ह्यातील विविध शाळांचे विशेष उपक्रम, शिक्षक मूल्यमापन, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, बोर्ड व शिष्यवृत्ती परीक्षा, बाह्य स्पर्धा परीक्षा, शालेय प्रशासन, कार्यालयीन नियोजन, भौतिक सुविधा तसेच सहशालेय उपक्रमांचा सर्वंकष आढावा घेण्यात आला. या सर्व निकषांमध्ये आळंदीतील या विद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत अव्वल स्थान मिळविले.

या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षक अनिता पडळकर, अनुजायिनी राजहंस, हेमांगी कारंजकर तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे अभिनंदन करण्यात आले. भविष्यातही गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरा कायम राखण्याचा विश्वास संस्थेचे सचिव अजित वडगांवकर यांनी व्यक्त केला.

## हुर्रे...दहावीची परीक्षा संपली; नीरा येथे विद्यार्थ्यांचा जल्लोष

नीरा (दै. संध्या)

दहावीच्या परीक्षेचा शेवटचा पेपर आज संपताच विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. आज झालेल्या भूगोलाच्या पेपरनंतर परीक्षा संपल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. नीरा येथील महात्मा गांधी विद्यालय केंद्राबाहेर विद्यार्थिनींनी पेपर आणि परीक्षा पॅड हवेत उडवत आपला आनंद व्यक्त केला. गेल्या काही आठवड्यांपासून अभ्यास, ताण आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली असलेल्या विद्यार्थ्यांना आज दिलासा मिळाला. शेवटचा भूगोलाचा पेपर चांगला गेल्याची भावना व्यक्त करत विद्यार्थ्यांनी



मित्रमैत्रिणींसोबत जल्लोष केला. काही विद्यार्थिनींनी एकमेकांना मिठ्या मारत आनंद साजरा केला, तर काहींनी मोबाईलवर फोटो आणि व्हिडिओ काढून हा क्षण जतन केला. विद्यार्थ्यांनी सांगितले की, यंदाचा भूगोलाचा पेपर तुलनेने सोपा होता. त्यामुळे परीक्षा संपल्याचा आनंद अधिकच द्विगुणित झाला. "गेल्या काही दिवसांपासून खूप अभ्यास केला होता. आता परीक्षा संपल्यामुळे खूप हलकं वाटत आहे," अशी प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पालकांनीही केंद्राबाहेर उपस्थित राहून आपल्या मुलांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. दरम्यान, परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी सुट्टीचा आनंद घेण्याचे नियोजन सुरू केले आहे. काही विद्यार्थी पुढील शिक्षणाच्या दिशेने तयारी करणार असून, काही जण सुट्टीत विविध छंद जोपासण्याचा विचार करत आहेत. एकूणच, दहावीच्या परीक्षेचा शेवटचा दिवस नीरा येथे उत्साह, आनंद आणि समाधानाचा ठरला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद त्यांच्या मेहनतीचे फळ असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले.

## केडगाव उपबाजारात गहू २८११ रुपये क्विंटल

दौंड (दै. संध्या)

केडगाव (ता. दौंड) उपबाजारात गव्हाची आवक व बाजारभावात वाढ झाली आहे. केडगावमध्ये गव्हाची ९७४ क्विंटल आवक झाली असून, त्यास किमान २२५०, तर कमाल २८११ रुपये क्विंटल असा बाजारभाव मिळाला. दौंड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजारात भुसार मालाची आवक व बाजारभाव स्थिर आहे.

केडगाव व पाटस येथील उपबाजारांमध्ये भुसार मालाची आवक वाढली असून, बाजारभाव स्थिर आहे. यवत येथील उपबाजारात भुसार मालाची घटली असून, बाजारभाव स्थिर आहे. दौंड मुख्य बाजारात पालेभाज्यांची आवक वाढली असून, दर स्थिर आहेत. कोथिंबिरीला शेकडा २०० ते ७०० रुपये, मेथीला २०० ते ८०० रुपये, तर शेपूला २०० ते ६०० रुपये भाव मिळाला. कांदापातीला ३०० ते ५०० रुपये दर मिळाला असून, द्राक्षांची २४ क्विंटल आवक होऊन प्रति १० किलोला २०० ते ५६० रुपये भाव मिळाला आहे. केडगाव उपबाजारात कांद्याची आवक वाढली आहे. मात्र, बाजारभावात प्रतिक्विंटल २०० रुपयांची घट झाली आहे. कांद्याची १६ हजार ४७५ क्विंटल आवक होऊन त्यास प्रतवारीनुसार किमान २००, तर कमाल १३०० रुपये प्रतिक्विंटल बाजारभाव मिळाला.

# केजीएन फाउंडेशनच्यावतीने शिरखुर्मा किट वाटप

नारायणगाव (दै. संध्या)

■ रमजान ईदनिमित्त गोरगरीब व गरजूंसाठी कौतुकास्पद सामाजिक उपक्रम

खवाजा गरिब नवाज फाउंडेशनच्या माध्यमातून रमजान ईदनिमित्त एक हात मदतीचा यामाध्यमातून नारायणगाव आणि परिसरातील गोरगरीब व गरजू मुस्लिम बांधवांना शिरखुर्मा किट



वाटप करण्यात आले. यावेळी मेहबूब काझी व एजाज आतार म्हणाले की, केजीएन फाउंडेशन विविध सामाजिक उपक्रम राबवत असून रमजान ईदनिमित्त गोरगरीब व गरजूंसाठी राबविण्यात आलेला शिरखुर्मा किट वाटप उपक्रम कौतुकास्पद आहे. तर अध्यक्ष जुबेर आतार यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून गरजूंसाठी आरोग्य शिबिर, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, उर्दू शाळेसाठी साहित्य व रंगकाम, मराठा आंदोलन काळात आंदोलकांना बिसलरी वाटप, कोरोना काळात किराणा किट वाटप यांसह विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवत असल्याचे सांगितले. यानिमित्ताने नारायणगाव मुस्लिम सुन्नी जमातचे अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त अलीसाबीर इनामदार, मेहबूब काझी, सिद्दीक शेख, आदम आतार, केजीएन फाउंडेशन अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, उपाध्यक्ष रज्जाक काझी, सचिव रियाज मनियार, सहसचिव समीर इनामदार, खजिनदार तौसिफ पठाण, कार्याध्यक्ष रिहान कुरेशी, यांसह सदस्य आमिर तांबोळी, डॉ. इम्रान शेख, दानिश इनामदार, इरफान काझी, जावेद पटेल, अशफाक पटेल, मोईन इनामदार, जाकिर मनियार, सलीम मनियार, जुबेर शेख, कायदेशीर सल्लागार ॲड.युसुफ आत्तार यांसह मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### एथर एनर्जीने एका वर्षात सेवा नेटवर्क दुप्पट केले, देशभरात 500 केंद्रांपर्यंत विस्तार

मुंबई (दैनिक संध्या) : भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दोन-चाकी वाहन निर्माता एथर एनर्जी लिमिटेड यांनी आज जाहीर केले की कंपनीने आपले सर्व्हिस नेटवर्क वाढवून देशभरात 500 अधिकृत सर्व्हिस सेंटरपर्यंत विस्तार केला आहे. वाढत्या रिटेल नेटवर्कसोबतच हा विस्तार करण्यात आला आहे. सुरुवातीपासूनच एथरने ज्या शहरांमध्ये स्कूटर्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत, त्या प्रत्येक ठिकाणी सर्व्हिस सपोर्ट देण्यावर भर दिला आहे. यामुळे ईव्ही मालकीचा अनुभव ग्राहकांसाठी अखंड, सोपा आणि सोयीस्कर बनवण्यावर कंपनीने आपला भर कायम ठेवला आहे. सर्व्हिस नेटवर्कचा विस्तार करण्याबरोबरच एथर एनर्जी सर्व्हिस क्वालिटी, कार्यक्षमता आणि ग्राहक अनुभव सुधारण्यासाठी सातत्याने गुंतवणूक करत आहे. कंपनीची गोल्ड सर्व्हिस सेंटर आधुनिक कस्टमर लाउंज, अत्याधुनिक सर्व्हिस उपकरणे आणि सुलभ प्रक्रियांनी सज्ज आहेत, ज्यामुळे पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढते. स्टँडर्ड सर्व्हिसिंगसोबतच एथरची एक्सप्रेसकेअर ही 60 मिनिटांत पूर्ण होणारी पिरिऑडिक मेंटेनन्स सर्व्हिस सध्या 82 सेंटरमध्ये उपलब्ध आहे. यामुळे ग्राहकांना नियमित सर्व्हिस जलद आणि सोयीस्कर पद्धतीने मिळते, आणि दर्जावर कोणतीही तडजोड होत नाही. वित्त वर्ष 2026 मध्ये एथर एनर्जीने आपले सर्व्हिस नेटवर्क जवळजवळ दुप्पट केले असून 277 वरून 500 सर्व्हिस सेंटरपर्यंत विस्तार केला आहे. यामुळे कंपनीने देशभरात आपला सर्व्हिस फुटप्रिंट मोठ्या प्रमाणात वाढवला आहे. या सर्व उपक्रमांमधून एथर एनर्जीचा प्रत्येक टचपॉइंटवर ग्राहकांचा सर्व्हिस अनुभव सातत्याने सुधारण्यावर असलेला भर स्पष्ट दिसतो. या सर्व उपक्रमांमधून एथर एनर्जीचा प्रत्येक टचपॉइंटवर ग्राहकांचा सर्व्हिस अनुभव सातत्याने सुधारण्यावर असलेला भर स्पष्ट दिसतो.

TEACHFORINDIA

### टीच फॉर इंडियाची फेलोशिप अर्जासाठी 22 मार्च मुदत; पदव्युत्तर शिक्षणाचीही संधी

पुणे (दैनिक संध्या) : शिक्षणातील समानतेसाठी कार्य करणाऱ्या टीच फॉर इंडिया संस्थेने २०२६ सालच्या फेलोशिपसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २२ मार्च २०२६ असल्याची घोषणा केली आहे. या फेलोशिपमुळे तरुणांना शिक्षण क्षेत्रात कार्य करत विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याची संधी मिळणार आहे. या फेलोशिपअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना दोन वर्षे पूर्णवेळ शिक्षक म्हणून काम करताना पदव्युत्तर शिक्षण घेण्याची संधी मिळेल. या कालावधीत फेलोजना 'ट्रान्सफॉर्मेशनल लर्निंग' या विषयातील पदवीही मिळणार आहे. फेलोजना परवडणाऱ्या खासगी शाळा किंवा इंग्रजी माध्यमाच्या सरकारी शाळांमध्ये अध्यापन करावे लागेल. या माध्यमातून ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी प्रयत्न करतील. या अभ्यासक्रमात वर्गातील संस्कृती, डेटा-आधारित अध्यापन, शैक्षणिक नेतृत्व, समुदाय सहभाग, कला व क्रीडा शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान अशा विविध विषयांचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना नेतृत्व कौशल्य विकसित करण्यास मदत करतो. टीच फॉर इंडियाचे वरिष्ठ अधिकारी अश्वथ भरत यांनी सांगितले की, या फेलोशिपमुळे तरुणांना नेतृत्व विकसित करण्याची संधी मिळते. पदवी पूर्ण केल्यानंतर संशोधन, धोरणात्मक भूमिका किंवा विविध सामाजिक क्षेत्रात काम करण्याचे मार्ग खुले होतात. सध्या टीच फॉर इंडियाच्या समुदायात १००० हून अधिक फेलोज कार्यरत आहेत. हा उपक्रम शिक्षणाच्या माध्यमातून अधिक समतोल आणि सक्षम समाज निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ही पदवी मुंबईतील सेंट झेवियर्स महाविद्यालयामार्फत दिली जाणार असून ती मुंबई विद्यापीठाशी संलग्न आणि मान्यताप्राप्त आहे. या अभ्यासक्रमाची वार्षिक फी सुमारे १५,००० रुपये असून गरजू उमेदवारांसाठी शिष्यवृत्तीचीही सुविधा उपलब्ध आहे.

### उत्सवापासून कौटुंबिक क्षणांपर्यंत : कलाकारांनी गुढीपाडव्याचा उत्साह साजरा केला



पुणे (दैनिक संध्या) : गुढीपाडवा आनंद, परंपरा आणि नव्या सुरुवातींचं वचन घेऊन साजरा केला जातो. घराबाहेर पारंपरिक गुढी उभारण्यापासून ते स्वादिष्ट पदार्थ बनवण्यापर्यंत आणि आपल्या प्रियजनांसोबत एकत्र येण्यापर्यंत, या सणात नवचैतन्याची भावना असते जी कुटुंबं आणि समाजाला एकत्र आणते. प्रत्येक घर आपापल्या पद्धतीने गुढीपाडवा साजरा करतं, पण या सणाचं खरं सौंदर्य त्या छोट्या छोट्या कृतींमध्ये दडलेलं असतं — घर सजवणं, सणाच्या जेवणाचा आनंद घेणं आणि नव्या वर्षाचं स्वागत आशा आणि कृतज्ञतेने करणं.या गुढीपाडव्याच्या निमित्ताने, सोनी सब चे कलाकार अक्षया हिंदळकर, श्रेणू पारिख, ऋषी सक्सेना, दीक्षा जोशी आणि रजत वर्मा यांनी सणाच्या उत्साहाशी आपला नातं कसं जोडलेलं आहे, तसेच परंपरा आणि आठवणींमुळे हा दिवस त्यांच्यासाठी कसा खास ठरतो, याबद्दल सांगितलं.

# जागतिक महिला दिना निमित्त महिलांसाठीचा रोजगार मेळावा संपन्न

## विविध नामांकित औद्योगिक कंपन्यांसाठी मुली आणि महिला उमेदवारांची प्राथमिक निवड

पिंपरी (दै. संध्या)

■ जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुणे आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स यांचा संयुक्त उपक्रम







पुणे जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार मुली आणि महिलांना खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुणे आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड येथील यशस्वी भवन येथे बुधवार दिनांक 18 मार्च 2026 रोजी जागतिक महिला दिनानिमित्त मुली आणि महिलांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न झाला.

या मेळाव्याला एकूण 53 महिला उमेदवारांनी सहभाग नोंदवला.या रोजगार मेळाव्यात दहावी उत्तीर्ण,बारावी उत्तीर्ण, आय टी आय, डिप्लोमा व पदवीधर अशा विविध शैक्षणिक पात्रता धारक मुली आणि महिला उमेदवारांनी ट्रेनी ऑपरेटर,क्षेत्र अधिकारी अशा विविध पदांसाठीच्या रिक्त पदांसाठी मुलाखती दिल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशस्वी एज्युकेशन सोसायटी सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस)चे संचालक डॉ.शिवाजी मुंढे यांची उपस्थिती होती. तसेच पुणे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे मार्गदर्शन अधिकारी सचिन ढेरे, तसेच कौशल्य विकास रोजगार उद्योजकता विभागाचे पदाधिकारी सुनील नाळे यांच्यासह यशस्वी संस्थेचे प्रमुख मनुष्यबळ व्यवस्थापक श्रीकांत मिरजकर, ऑपरेशन विभाग प्रमुख नितीन थेटे यासह औद्योगिक कंपन्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापन विभागातील पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी मुली आणि महिलांनी औद्योगिक कंपन्यांमध्ये उपलब्ध असलेल्या रोजगार संधींची माहिती घेऊन स्वतःचे करिअर घडवण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

तर यावेळी उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन करताना कौशल्य विकास विभागाचे पदाधिकारी सुनील नाळे यांनी विभागाच्या विविध उपक्रमाविषयी सविस्तर माहिती सांगितली तसेच www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर किंवा 020-26133606 या दूरध्वनी क्रमांकावर रोजगार संधीसाठी मुली आणि महिला उमेदवारांनी मोफत नाव नोंदणी करावी असे आवाहन केले.या संकेतस्थळा मार्फत 18,000 हून अधिक नामांकित औद्योगिक कंपन्यांमधील रोजगार संधी गरजू उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अश्विनी ताकटे यांनी केले. या रोजगार मेळाव्यासाठी चाकण, भोसरी, तळेगाव, पिंपरी चिंचवड, हिंजवडी, हडपसर इत्यादी पुणे जिल्ह्यातील विविध एमआयडीसी परिसरातील नामांकित औद्योगिक कंपन्यांमधील 410 रिक्त पदांच्या रोजगार संधीसाठी मुलाखती घेण्यात आल्या.

# बजाज जनरल इन्श्युरन्सचे व्यावसायिक वाहनांसाठी 'इको अॅश्युअर'

पुणे (दै. संध्या)



■ किफायतशीर आणि विश्वसनीय दुरुस्ती कव्हरेजचा मार्ग

भारतातील अग्रगण्य खाजगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड) कंपनीने आज व्यावसायिक वाहनांसाठी इको अॅश्युअर हे नवीन अॅड-ऑन कव्हर लाँच केल्याची घोषणा केली.
हे नवीन कव्हर व्यावसायिक वाहन मालकांना दुरुस्तीचा खर्च अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यास मदत करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. तसेच, त्यांच्या वाहनांची कमीत कमी व्यत्ययासह सतत कार्यरत राहण्याची खात्री करण्यासाठीही हे उपयुक्त ठरेल. व्यावसायिक वाहने ही भारतभर मालवाहतूक, पुरवठा साखळी आणि व्यवसायिक गतिशीलता यांना समर्थन देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, दुरुस्तीचा वाढता खर्च, वाढते मेंटेनन्स अडचणी आणि व्यावसायिक वाहनांची असुरक्षितता यामुळे वाहनमालक आणि चालकांसाठी दुरुस्ती अनेकदा खर्चिक बाब ठरते. इको अॅश्युअर हे या अडचणींवर उपाय म्हणून विकसित करण्यात आले आहे. यामध्ये रिपेअरिंगचे अधिक व्यापक कव्हरेज, विश्वासार्ह दुरुस्ती पर्याय आणि अधिक संरक्षणात्मक फायदे प्रदान करण्यात आले आहेत अॅड-ऑन दोन पर्यायांमध्ये उपलब्ध आहे: इको अॅश्युअर इसेन्शल आणि इको अॅश्युअर अॅडव्हान्टेज हे कस्टमरला त्यांच्या गरजा पूर्ण करणारा प्लॅन निवडण्याची लवचिकता प्रदान करतात. इको रिपेअर कव्हरचे मुख्य फायदे म्हणजे दुरुस्ती करताना रिकंडिशन (पुन्हा दुरुस्त केलेले) पार्ट्स वापरल्यास डेप्रीसिएशन वर 100% सूट दिली जाते. ज्यामुळे दुरुस्तीचा खर्च कमी करण्यास मदत होते. नवीन पार्ट्स दुरुस्तीसाठी निवडलेल्या प्रकरणांमध्ये निवडलेल्या प्लॅननुसार ते 25% पर्यंत डेप्रीसिएशन सूट प्रदान करते.

# असुर्डे खापरेवाडी ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये भव्य प्रवेश

## आमदार शेखर निकम यांच्या कार्यपद्धतीवर ठाम विश्वास, शिवसेना (उबाठा)ला धक्का

चिपळूण (दै. संध्या)

■ लोकांच्या समस्या ऐकून घेणे ही सुरुवात असते, पण त्या सोडवणे हीच खरी नेतृत्वाची ओळख - आमदार शेखर निकम



चिपळूण तालुक्यातील कोकरे जिल्हा परिषद गटातील असुर्डे खापरेवाडी येथील ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे स्थानिक राजकारणात चांगली चर्चा रंगली असून शिवसेना (उबाठा) पक्षाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

यावेळी सोमा खापरे, काशिनाथ खापरे, संतोष खापरे, अजित खापरे, सुमित खापरे, राजेंद्र खापरे, प्रमोद खापरे, प्राजक्ता खापरे, अंकित खापरे, वंदना खापरे, शशिकांत खापरे, सुगंधा खापरे, योगेश खापरे, आरती खापरे, स्वाती खापरे, आयुष आग्रे, आर्यन खापरे, दिनेश खेराडे, सुजाता खेराडे, नरेंद्र खापरे, मानसी खापरे, राजेश आग्रे, कृष्णा आग्रे, अरुण आग्रे, अर्चना आग्रे, सायली आग्रे, मंगेश खापरे, गणपत खापरे, मिनाक्षी खापरे, अंजली खापरे, मारुती खापरे, प्रणय खापरे, बापूजी खापरे, प्रणय खापरे, सुजाता खापरे, महेंद्र खापरे, बापूजी खापरे, सुस्मिता खापरे, पांडूरंग खापरे, प्रतिभा खापरे, महेश खापरे, शांताराम शिगवण, विशाल शिगवण, दत्ताराम खापरे, कृष्णा खापरे, सुरज खापरे, सावी खापरे, रेश्मा खापरे, शर्मिला भुवड, धोंडू भुवड, संदेश खापरे, पारस खापरे, गणेश खापरे, सृष्टी खापरे, नारायण खापरे, ओम खापरे, सार्थक खापरे, निखील खापरे, ओम भुवड यांनी उत्स्फूर्तपणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

आमदार शेखर निकम यांनी सर्व नवप्रवेशितांचे संपर्क कार्यालयात मनापासून स्वागत करत त्यांच्याशी सविस्तर संवाद साधला. ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेत त्या सोडवण्यासाठी व विकासात्मक कामांना गती देण्यासाठी सदैव कटिबद्ध राहण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच याचा पक्ष वाढीसाठी व पक्ष संघटना वाढीसाठी नक्कीच फायदा होईल असे नमूद केले.

ननिर्वाचित सावर्डे जि. प. गट सदस्या पुजा निकम यांनीही असुर्डे खापरेवाडी प्रवेशकर्ते ग्रामस्थांचे पक्षात स्वागत केले व त्यांना पक्ष वाढविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.


यावेळी नवनिर्वाचित कोकरे जि.प. गट सदस्य संजय कदम यांनीही असुर्डे खापरेवाडी ग्रामस्थांचे पक्षात स्वागत केले व आपण पक्ष वाढीसाठी एकत्र काम करत राहू तसेच भविष्यात ग्रामस्थांच्या विकासात्मक कामांबाबत ठामपणे पाठीशी उभा राहण्याचा शब्द त्यांनी दिला.

कार्यक्रमास नवनिर्वाचित सावर्डे जि.प. सदस्या पुजा निकम, कोकरे जि.प. गट सदस्य संजय कदम, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष दत्ताराम गुजर, आरडीसीसी संचालक राजेंद्र सुर्वे, सरपंच पंकज साळवी, सुधीर राजेशिर्के, निलेश खापरे यांच्यासह कोकरे जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा प्रवेश केवळ राजकीय बदल नसून विकासाच्या दिशेने उचललेले ठोस पाऊल असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. आमदार शेखर निकम यांच्या नेतृत्वाखाली परिसराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

# सेन्को गोल्ड अँड डायमंड्स गुढीपाडव्यानिमित्त विशेष ऑफर्स आणि सणासुदीच्या दागिन्यांची घोषणा

मुंबई (दै. संध्या)





गुढीपाडवा, जो महाराष्ट्रीयन नवीन वर्ष आणि वसंत ऋतूच्या आगमनाचे प्रतीक आहे, हा सण नवीन सुरुवात, समृद्धी आणि उद्घाटनांशी जोडलेला आहे. पारंपरिकरित्या, सोन्याचे दागिने घरी आणण्यासाठी हा सर्वात शुभ प्रसंगांपैकी एक मानला जातो, जे केवळ संपत्तीच आणत नाहीत, तर सकारात्मक ऊर्जा आणि वर्षाच्या उज्ज्वल सुरुवातीचे प्रतीक देखील आहेत.

या नवीन वर्षाच्या निमित्ताने, सेन्को गोल्ड अँड डायमंड्स दागिन्यांचा एक विचारपूर्वक तयार केलेला आणि खास संग्रह सादर करत आहे, जो परंपरा, कारागिरी आणि आधुनिक डिझाइनचा सुंदर मिलाफ साधतो. हे दागिने जीवनातील विशेष आणि अविस्मरणीय क्षण साजरे करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत, मग ती नवीन वर्षासाठी केलेली नवीन खरेदी असो, कौटुंबिक सोहळे असोत किंवा वैयक्तिक महत्त्वाचे टप्पे असोत.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेवर विशेष लक्ष केंद्रित करून, या संग्रहात पारंपरिक प्रादेशिक डिझाइनपासून प्रेरित दागिन्यांचा समावेश आहे. क्लासिक नथ आणि नाजूक कलाकुसर केलेली तुशी यांसारख्या प्रमुख शैलींना त्यांचा पारंपरिक आत्मा कायम ठेवत, नाजूक आणि आधुनिक तपशिलांसह नव्याने सादर करण्यात आले आहे. समृद्धी, संरक्षण आणि शुभत्वाशी संबंधित असलेले हे दागिने पिढ्यानपिढ्या भावनिक महत्त्व टिकवून आहेत आणि सणासुदीच्या पोशाखाचा अविभाज्य भाग आहेत.

या पारंपरिक दागिन्यांव्यतिरिक्त, या संग्रहात सोन्याचे हार, मंगळसूत्रापासून प्रेरित डिझाइन, अँटिक फिनिशचे दागिने, स्टेटमेंट इअररिंग्स आणि समकालीन डिझाइनचाही समावेश आहे, जे सणासुदीच्या प्रसंगांसाठी तसेच दैनंदिन शालीनतेसाठी एक बहुपयोगी पर्याय उपलब्ध करून देतात.

या प्रसंगी बोलताना, सेन्को गोल्ड अँड डायमंड्सच्या मार्केटिंग आणि डिझाइन विभागाच्या संचालक आणि प्रमुख, जोयिता सेन म्हणाल्या, "गुढीपाडवा हा आशा, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जेने भरलेल्या एका शुभ नवीन सुरुवातीचे प्रतीक आहे. सेन्कोमध्ये, आम्ही परंपरा आणि अर्थ दोन्ही दर्शवणाऱ्या दागिन्यांसह हे विशेष क्षण साजरे करण्यावर विश्वास ठेवतो. आमचे डिझाइन्स जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांचा भाग बनण्यासाठी तयार केले आहेत, जे काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेली उत्कृष्ट कारागिरी दर्शवतात, तसेच आधुनिक विचार आणि बदलत्या फॅशन्स व गरजांनुसार विकसित होत आहेत. यावर्षी, आमच्या विशेष सणासुदीच्या ऑफर्ससह, आम्ही ग्राहकांना खऱ्या अर्थाने शुभ आणि आनंदी सुरुवातीसह नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी आमंत्रित करतो." सणासुदीचा काळ आणखी खास बनवण्यासाठी, सेन्को गोल्ड अँड डायमंड्सने मर्यादित कालावधीसाठी विशेष ऑफर्स सादर केल्या आहेत. ग्राहक सोन्याच्या दरावर प्रति ग्रॅम ₹४०० पर्यंत आणि सोन्याच्या दागिन्यांवरील घडणावळीच्या शुल्कावर २०% पर्यंत सूट मिळवू शकतात. हा ब्रँड हिऱ्यांच्या दागिन्यांवरील घडणावळीच्या शुल्कावर ५०% पर्यंत आणि हिऱ्यांच्या मूल्यावर १२% पर्यंत सूट देत आहे. दागिन्यांचा प्रत्येक नमुना कुशल कारागिरांद्वारे हाताने बनवला जातो आणि त्यात BIS हॉलमार्किंग व IAGES प्रमाणपत्राचा समावेश असतो, जे मालाची खरेदी, किमतीतील पारदर्शकता आणि कार्यप्रणाली यांच्या कठोर त्रयस्थ मूल्यांकनानंतर प्रदान केले जाते. हे शुद्धता, विश्वास आणि नैतिक मानकांप्रति असलेल्या सेन्कोच्या वचनबद्धतेला अधिक दृढ करते.

# आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमधील वेळेवर उपचाराने जैन श्रावकाचे जीवघेण्या जखमेतून प्राण वाचले

पुणे (दै. संध्या)



आध्यात्मिक भक्तीने सुरू झालेली जैन विहार समूहाची शांत सकाळ काही क्षणांतच गंभीर अपघातात बदलली. पायी प्रवास करणाऱ्या जैन विहार समूहाचा पुणे जिल्ह्यातील साते गावाजवळ गंभीर रस्ता अपघात झाला. जैन समाजातील पवित्र धार्मिक परंपरा असलेल्या 'विहार'साठी हा समूह कामशेत ते वडगाव असा प्रवास करत होता. त्यावेळी भरधाव ट्रकने धडक दिल्याने २९ वर्षीय जैन श्रावक सहज बाफना हे गंभीर जखमी झाले.

तेथे वडगाव येथील जैन विहार समूहातील सदस्य तसेच मावळ तालुका टीमने तातडीने मदतीसाठी धाव घेतली. त्यानंतर बाफना यांना विलंब न करता पुण्यातील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. रुग्णालयातील आपत्कालीन ट्रॉमा टीमने त्यांना दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर तातडीने दोन तासांच्या आत शस्त्रक्रिया सुरू केली.

रुग्णाच्या मेंदूमध्ये अनेक ठिकाणी रक्तस्राव झाला होता, तसेच डाव्या पायाला आणि याच पायाच्या पंज्याला अत्यंत गंभीर जखम झाली होती. त्यामुळे कायमस्वरूपी अपंगत्व येण्याचा आणि पाय कापण्याची वेळ येण्याचा मोठा धोका निर्माण झाला होता. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमधील बहुविद्याशाखीय वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या पथकामध्ये प्लास्टिक आणि पुनर्रचना शल्यचिकित्सक डॉ. सोमनाथ कराड, न्यूरोसायन्सेस वरिष्ठ संचालक व स्कल बेस सर्जन डॉ. राकेश रंजन, ऑर्थोपेडिक सर्जन सल्लागार डॉ. आकाश टाटीया आणि प्लास्टिक सर्जरी सल्लागार डॉ. विक्रम वाघ यांचा समावेश होता. त्यांना अतिदक्षता तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, फिजिशियन आणि पुनर्वसन तज्ज्ञ यांचेही सहकार्य मिळाले आणि समन्वयाने उपचार सुरू करण्यात आले.

वेळेवर उपचार मिळाल्याने आणि सातत्याने निरीक्षणामुळे दोन दिवसांत रुग्णाच्या डोक्याची जखम लक्षणीयरीत्या सुधारली आणि मेंदूची शस्त्रक्रिया करण्याची गरज पडली नाही. त्यानंतर पुढील काही दिवसांत जखमी पायाची पुनर्रचना व स्थिर करण्यासाठी अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. अखेरीस डॉक्टरांना त्यांचा डावा पाय आणि पायाचा पंजा वाचवण्यात यश आले.

आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, पुणे येथील ऑर्थोपेडिक सर्जन सल्लागार डॉ. आकाश टाटीया म्हणाले, "रुग्णाला डोक्याची गंभीर दुखापत आणि पायाला गंभीर जखम झाली होती. त्यासाठी तातडीने वैद्यकीय उपचार आवश्यक होते. वेळेवर रुग्णालयात आल्याने, त्वरित शस्त्रक्रिया आणि विविध तज्ज्ञ विभागांमधील उत्तम समन्वय यामुळे रुग्णाचा जीव आणि पाय दोन्ही वाचवणे शक्य झाले. अशा घटना वेळेवर ट्रॉमा केअरचे महत्त्व अधोरेखित करतात आणि समुदायासाठी समर्पित रुग्णसेवा देण्याच्या आमच्या बांधिलकीला बळ देतात."

रुग्णालयात उपचार सुरू असताना अनेक जैन संस्था, दानशूर आणि समाजातील नागरिकांनी रुग्ण व त्यांच्या कुटुंबाला भक्कम पाठिंबा दिला. रुग्णालय प्रशासनानेही रुग्णाच्या प्रकृतीबाबत नियमित वैद्यकीय माहिती हितचिंतकांपर्यंत पोहोचवली. त्यामुळे उपचार प्रक्रियेदरम्यान रुग्णसेवक आणि समाज यांच्यात उत्तम समन्वय दिसून आला.

यशस्वी उपचारानंतर आणि प्रकृती सुधारल्यानंतर बाफना यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. घरी परतल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी आणि जैन समाजातील सदस्यांनी त्यांचे भावनिकतेने स्वागत केले.

आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी पामेश गुप्ता म्हणाले, "या अत्यंत महत्त्वाच्या क्षणी जैन समाजाने आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आम्ही आभारी आहोत. प्रत्येक गरजू व्यक्तीला वेळेवर, संवेदनशीलतेने आणि दर्जेदार आरोग्यसेवा प्रदान करणे हा आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमधील आमचा मूलभूत सिद्धांत आहे.

आदित्य बिर्ला समूहाच्या मूल्यांनुसार आम्ही सर्व समाजघटकांची सेवा करण्यासाठी आणि वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्या सोबत उभे राहण्यासाठी कटिबद्ध आहोत."

ही घटना समुदायाचे तातडीने केलेले सहकार्य, जलद वैद्यकीय प्रतिसाद आणि विविध तज्ज्ञांच्या समन्वयातून दिलेले उपचार यामुळे संभाव्य दुर्दैवी प्रसंगातूनही रूग्ण पुनर्प्राप्ती आणि नव्या आशेच्या कथेत बदलू शकतो याची जाणीव करून देते.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद अथर्व शर्मा, माध्वीन कामत जोडीने पटकविले

पुणे (दैनिक संध्या) : इंटरनॅशनल टेनिस फेडरेशनच्या वतीने कोलकाता येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत भारताच्या अथर्व शर्मा (पुणे) व माध्वीन कामत (गुजरात) या जोडीने पुरुष दुहेरीचे विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत एकमेकांच्या साथीने प्रथमच खेळणाऱ्या अथर्व व माध्वीनने चमकदार कामगिरी करत भारताच्याच कबीर हंस व मान केसरवानी या जोडीचा ६-४, ६-४ असा पराभव केला. एक तासाहून अधिक वेळ चाललेल्या या सामन्यात दोन्ही सेटमध्ये अथर्व व माध्वीन जोडीने वर्चस्व कायम राखले. सुरुवातीपासूनच दोघांनीही उत्तम सर्व्हिस आणि आक्रमक खेळ करत गुणांमध्ये आघाडी घेतली. ही आघाडी अखेरपर्यंत टिकवून ठेवत संपूर्ण स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरी कायम ठेवली. या विजेतेपदानंतर अथर्वने जागतिक क्रमवारीत ५९० वरून ५०० व्या स्थानी झेप घेतली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पुरुष गटात अथर्वने याआधीही आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे विजेतेपद व उपविजेतेपद पटकविले आहे. अथर्व शर्मा म्हणाला, "आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणे ही अभिमानाची गोष्ट आहे. सलग तिसऱ्यांदा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्याचा आनंद वाटतो. माझे आणि माध्वीनचे एकत्र खेळणे हे पहिल्यांदाच होते. त्याच्यासोबत खेळताना खूप मजा आली. या प्रवासात आम्हाला कुटुंबीय, प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन व मोलाची साथ लाभली."



## भाजपा व्यापारी आघाडी ठाणे ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षपदी काका पाटील

भिवंडी(दैनिक संध्या) : भिवंडी तालुक्यातील खांडपे गावचे सुपुत्र तथा भाजपचे धडाडीचे ज्येष्ठ कार्यकर्ते काका पाटील यांची नुकतीच भाजपा व्यापारी आघाडी ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना मा. केंद्रीय मंत्री तथा मा. खासदार कपिल पाटील व जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांच्या हस्ते अधिकृतपणे नियुक्तीपत्राद्वारे जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. यावेळी भाजपाचे पदाधिकारी उमेश पाटील, युवा नेते योगेश हजारे तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काका पाटील यांच्या निवडीमुळे खांडपे गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. व्यापारी आघाडीच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तर वरिष्ठांनी सोपवलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडण्याचा निर्धार काका पाटील यांनी व्यक्त केला आहे.



## झील संस्थेच्या 118 विद्यार्थ्यांची टाटा टोयो रेडिएटरमध्ये निवड

पुणे (दैनिक संध्या) : झील एज्यूकेशन सोसायटी संचलित कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड रिसर्च आणि झील पॉलीटेक्निक , नऱ्हे येथील एकूण 118 विद्यार्थ्यांची प्रतिष्ठित टाटा टोयो रेडिएटर या कंपनीत निवड झाली आहे. ही झील संस्थेसाठी एक उल्लेखनीय आणि अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन (E&TC), इलेक्ट्रिकल, रोबोटिक्स अँड ऑटोमेशन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या उल्लेखनीय प्लेसमेंटमुळे झील संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि उच्च दर्जाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा प्रत्यय येतो. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत संस्थेचे संस्थापक संचालक एस . एम . काटकर, सचिव डॉ जयेश एस. काटकर म्हणाले की, विद्यार्थ्यांचे हे यश झील संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य विकासाचे उत्तम उदाहरण आहे. कॅम्पस डायरेक्टर उद्धव सिद म्हणाले की, विद्यार्थ्यांचे यश हे झील संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या उच्च दर्जाच्या शिक्षणाचे आणि उद्योगसिद्ध प्रशिक्षणाचे प्रतिक आहे, ज्यामुळे विद्यार्थी उद्योगाच्या बदलत्या गरजांना समर्थपणे सामोरे जाऊ शकतात. यावेळी डॉ अजित काटे म्हणाले की, एकाच वेळी इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची निवड होणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असून विद्यार्थ्यांच्या मेहनत आणि समर्पणाचे हे फलित आहे. झील सेंट्रल प्लेसमेंट सेलचे डीन – ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डॉ जितेंद्र खुबानी म्हणाले की, 118 विद्यार्थ्यांची झालेली निवड ही त्यांच्या क्षमतेचे द्योतक असून झील संस्थांचे उद्याचे सक्षम नेते आणि नवोन्मेषक घडवण्याची बांधिलकी अधोरेखित करते.

## श्रीराम जन्मोत्सवाची जय्यत तयारी

काऱ्हाटी(दैनिक संध्या) : ता. बारामती येथे प्रभू श्रीराम जन्मोत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. रामनवमीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला आहे. सप्ताहाचे हे ३७ वे वर्ष आहे. गुरुवार (दि. १९) ते शुक्रवार (दि. २७) या काळात हरिनाम सप्ताह होणार आहे. श्री विठ्ठल मंदिर परिवार, काऱ्हाटी यांच्या वतीने या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाच्या काळात दररोज काकडा भजन, हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन व प्रवचन होणार आहे. या सप्ताहात ह.भ.प. नाना महाराज गोफणे, गोरख महाराज कुंभार, प्रवीण महाराज चौधरी, शिवलीलाताई पाटील, अश्विनीताई कोपनर, राहुल महाराज राजगुरू, गोरक्षनाथ महाराज सुतार, प्रेम मूर्ती नवनाथ महाराज निम्हण, गणेश महाराज शेळके, यांचे कीर्तन होणार आहे. शेवटच्या दिवशी ह.भ.प. नारायण महाराज खोपडे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

# ‘क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सृष्टी’ प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करा – महापौर रवि लांडगे

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहरात उभारण्यात येत असलेल्या ‘क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सृष्टी’ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. यासाठी महापालिकेच्या स्थापत्य, विद्युत, उद्यान आदी संबंधित सर्व विभागांनी समन्वय साधून काम करावे, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.



पिंपरी येथे उभारण्यात येत असलेल्या या प्रकल्पाच्या कामाचा महापौर रवि लांडगे यांनी प्रत्यक्ष स्थळावर भेट देत सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी नगरसदस्या अनुराधा गोरखे,सुप्रिया चांदगुडे, नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, माजी नगरसदस्य मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते विशाल जाधव, शंकर लोंढे, प्रल्हाद कांबळे, आनंदा कुदळे, ॲड.विद्या शिंदे, कविता खराडे यांच्यासह महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता वैशाली ननावरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे यांनी यावेळी प्रकल्पाच्या परिसरात सुरू असलेल्या विविध कामांची पाहणी केली. शिल्प व पुतळ्यांची उभारणी, अत्याधुनिक एलईडी स्क्रीन, प्रकाश व्यवस्था, आकर्षक बाग (गार्डन) तसेच नक्षीकाम यांसारख्या विविध घटकांची माहिती त्यांनी संबंधित विभागांकडून घेतली. प्रत्येक कामाची गुणवत्ता उच्च राखण्याच्या सूचना देत प्रकल्पाचे सौंदर्य आणि उपयुक्तता अधिक प्रभावी करण्यावर त्यांनी भर दिला.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, “महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजप्रबोधनासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही सृष्टी एक प्रेरणादायी केंद्र ठरेल. त्यामुळे या ठिकाणाची उभारणी करताना दर्जा आणि वेळ यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. शहराच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक जडणघडीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या या महापुरुषांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या सृष्टीचे काम नियोजित वेळेत व उच्च दर्जाने पूर्ण करण्यात यावे.”

या सृष्टीमध्ये नागरिकांसाठी ऐतिहासिक व प्रेरणादायी माहितीबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण आणि जनजागृतीची संधी उपलब्ध होणार आहे. एलईडी स्क्रीनद्वारे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा तसेच विविध सामाजिक संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. याशिवाय आकर्षक बाग, प्रकाशयोजना आणि कलात्मक नक्षीकामामुळे हा परिसर नागरिकांसाठी एक सुंदर पर्यटनस्थळ ठरणार आहे, असेही महापौर रवि लांडगे यांनी सांगितले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत सविस्तर माहिती महापौर रवि लांडगे यांना दिली.

## मोकाट कुत्र्यांचा धुमाकुळ; एकाच दिवसात १३ जणांवर हल्ला

चाकण (दै. संध्या)

चाकण शहर व परिसरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात धुमाकूळ सुरु असून, एकाच दिवसात या कुत्र्यांनी चक्क १३ जणांवर जीवघेणा हल्ला केल्याची बाब समोर आली आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांनी तातडीने अधिक उपचारासाठी चाकण ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. जखमींना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आल्याचे चाकण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन कांबळे यांनी सांगितले. चाकण मध्ये शोभा वाघमारे या महिलेला श्वानांनी हल्ला करून ठार केल्यानंतर त्याच भागात मोकाट कुत्र्यांनी ही दहशत माजवली. चाकण मधील ३२ वर्षीय महिलेला कुत्र्याने ठार केल्याची ही घटना या भागातील पहिलीच घटना नाही. तर यापूर्वी मेदनकरवाडी येथे एक मुलगी अशाच प्रकारे कुत्र्यांच्या हल्ल्यात ठार झाली आहे. चार जानेवारीला चाकण शहरात पिसाळलेल्या कुत्र्यांनी चक्क एकाच वेळी ३३ नागरिकांना चावा घेतला होता. चाकण परिसरात अनेक ठिकाणी लहान मुलांवर भटक्या कुत्र्यांनी जीवघेणे हल्ले केल्याच्या नोंदी प्रशासनाकडे आहेत. मानवावर हल्ला करून ठार करणारी कुत्री म्हणजे लांडग्याची नवी प्रजात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. चाकण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन कांबळे यांनी सांगितले की," भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेले नागरिक दररोज उपचारासाठी येथे येतात.

## कराटे क्यु बेल्ट व ब्लॅक बेल्ट स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

जेजुरी (दै. संध्या)

दिल्ली येथील इंदिरा गांधी इंटरनॅशनल स्टेडियम येथे आयोजित आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यशवंतराव चव्हाण भवन सासवड येथे सन्मान करण्यात आला.

गत वर्षी व यावर्षी ब्लॅक बेल्ट व क्यू बेल्ट परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे या कार्यक्रमात विशेष कौतुक करण्यात आले.

पुणे जिल्हा भाजपाचे अध्यक्ष शेखर वढणे ,स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठान,सासवडचे अध्यक्ष संतोष जगताप यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.




पुणे जिल्हा भाजपाचे अध्यक्ष शेखर वढणे यांनी कराटे हा केवळ एक खेळ नसून तो जीवनशैली आहे. नियमित सरावामुळे शरीर तंदुरुस्त राहते, तसेच मानसिक स्थैर्य आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, संयम आणि आत्मविश्वास या गुणांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. तसेच आजच्या काळात आत्मसंरक्षणाची गरज अधिक महत्त्वाची बनली असून, कराटेचे प्रशिक्षण हे प्रत्येकासाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी नमूद केले. पालकांनीही आपल्या मुलांना अशा क्रीडा प्रकारांकडे प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

खेळाडूंनी पराभवातून शिकत पुढे जाण्याची वृत्ती ठेवावी आणि देश-राज्य पातळीवर यश मिळवण्यासाठी सातत्याने मेहनत घ्यावी, असा संदेश संतोष जगताप यांनी दिला.

ग्रँड मास्टर प्रदीप वाघोले, सेन्साई तेजस वाघोले, ललित वाघोले, गणेश पापळ आणि पायल वाघोले यांचे यावेळी कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाला पालक, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑनलाइन शेअर ट्रेडिंगमध्ये मोठ्या नफ्याचे आमिष

### रहाटणी येथील व्यक्तीची ५१ लाख ८७ हजारांची फसवणूक

पुणे (दै. संध्या)

ऑनलाईन शेअर ट्रेडिंगमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून रहाटणी येथील एका व्यक्तीची तब्बल ५१ लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे. काळेवाडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे त्यांच्या रहाटणी येथील राहत्या घरी असताना आरोपींनी




त्यांच्याशी संपर्क साधला. ‘सर्कल ऑफ इन्साइट’ नावाच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲड करून stocks. cora-pro.com या संकेतस्थळाची माहिती देण्यात आली. त्यानंतर त्या साईटवर खाते उघडण्यास सांगून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास जास्त परतावा मिळेल, असे आमिष दाखवण्यात आले.

आरोपींनी वेळोवेळी वेगवेगळ्या स्टॉक्समध्ये गुंतवणूक करण्यास सांगत फिर्यादींकडून विविध बँक खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर करून घेतले. अधिक नफा दाखवून विश्वास संपादन करत अखेरीस एकूण ५१ लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली.

ही घटना १ सप्टेंबर २०२५ ते ७ ऑक्टोबर २०२५ दरम्यान रहाटणी परिसरात घडली. याप्रकरणी १६ मार्च २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप आरोपी अटकेत नसून पोलीस निरीक्षक (गुन्हे) धुमाळ हे पुढील तपास करत आहेत.

## चाकणला कचऱ्याच्या दुर्गंधीने प्रवाशांचा कोंडतोय श्वास

चाकण (दै. संध्या)

बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर गेल्या दहा वर्षांपूर्वी नव्याने बांधण्यात आलेले चाकण एसटी बस स्थानक समस्यांच्या विळख्यात अडकले आहे. बस स्थानक परिसरात कचऱ्यामुळे बकालपणा वाढत चालला असून, वाढत्या दुर्गंधीने प्रवाशांचा श्वास कोंडू लागला आहे. असुविधांचे आगर म्हणून प्रख्यात असलेले चाकण एसटी बस स्थानक हे असून अडचण नसून खोळंबा, अशी स्थिती निर्माण झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले असून चाकण एसटी बस स्थानकात पिण्यासाठी स्वच्छ पाणी नाही. स्वच्छता गृह बंद असते. बस स्थानकालगत कचऱ्याचे मोठमोठे ढिग साचलेले दिसत आहेत. कचऱ्यातून सुटलेली दुर्गंधी असे चित्र सध्या चाकण एसटी बस स्थानकावर दिसून येत आहे. असुविधांचे अगर म्हणून चाकण एसटी बस स्थानक सध्या समस्यांच्या गर्तेत अडकलेले आहे. या सर्व गैरसोयींमुळे प्रवासी हैराण झाले असून, स्थानका लगतचा कचरा कोण उचलणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.



## महिला दिनानिमित्त व्याख्यान व स्पर्धांचे आयोजन

### ‘मन जिंकलं तर जग जिंकता येतं’ विषयावर मार्गदर्शन

पुणे (दै. संध्या)

उरुळी कांचन येथील कस्तुरबा मातृ मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने 'मन जिंकलं तर जग जिंकता येतं' या विषयावर अश्विनी सचिन जगताप यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अलका शंकरराव साळुंखे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे आहारतज्ञ शोभा इंद्राणी असणार आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने घेतलेल्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. महात्मा गांधी सर्वोदय संघाचे डॉ सायरस पुनावाला इंग्लिश मीडियम स्कूल याठिकाणी शनिवार दि. 21 मार्च 2026 रोजी दु. 2 ते 5 दरम्यान कार्यक्रम संपन्न होणार आहे जास्तीत जास्त महिलांनी संबंधित कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन उरुळी कांचन येथील कस्तुरबा मातृ मंडळाच्या संस्थापिका - अध्यक्षा सुरेखा देविदास भन्साळी यांनी केले. विविध गुण दर्शन स्पर्धा - गाणे, नृत्य, एकांकिका, नाटिका अथवा वैयक्तिक सामुदायिकरित्या सादरीकरण अपेक्षित शुक्रवार दि.20 मार्च 2026 रोजी संपन्न होणार आहे. तसेच 'निबंध स्पर्धा' - 'मन जिंकलं तर जग जिंकता येतं' हा विषय. 'पाककृती स्पर्धा' - मक्यापासून बनवलेले पदार्थ, ताज्या फळापासून बनवलेले पदार्थांची चव, नाविन्य, पोषणमूल्य व आकर्षक मांडणी. शनिवार दि.21 मार्च 2026 रोजी संपन्न होईल अशी माहिती कस्तुरबा मातृ मंडळाच्या सदस्या रश्मी संजीव कुलकर्णी यांनी बोलताना दिली. याप्रसंगी कस्तुरबा मातृ मंडळाच्या सचिव संगिता भालके, खजिनदार जयश्री बेदरे, प्रिया बलदोटा, छाया नहार, राजश्री शितोळे, स्वाती चौधरी उपस्थित होत्या.

## किवळे येथील प्राथमिक शाळेला ISO मानांकन




शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या तरस यांच्याकडून मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन

पुणे (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळा किवळे क्र.९६ या शाळेला ISO 9001:2015 (Quality Management System) मानांकन प्राप्त झाले असून शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याची अधिकृत दखल घेण्यात आली आहे. या यशाबद्दल शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले आहे.

Vitsin World Services Private Limited या संस्थेमार्फत शाळेचे मूल्यमापन करण्यात आले. गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी, शिस्तबद्ध नियोजन, परिणामकारक अध्यापन पद्धती, सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रम या बाबींमध्ये शाळेने उच्च दर्जा राखल्याचे या मानांकनातून सिद्ध झाले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अभ्यासक्रमानुसार प्रभावीपणे प्राथमिक शिक्षण राबवण्यात शाळा यशस्वी ठरली असून ही बाब अभिमानास्पद असल्याचे मत व्यक्त होत आहे.

या यशामागे ‘ब’ प्रभागाच्या पर्यवेक्षिका सौ. सरस्वती भेगडे, प्रभारी मुख्याध्यापक बाबासाहेब आव्हाड तसेच शिक्षकवृंद—रेखा गादेकर, वृषाली मुंढे, विनायक शिरतर, मृणाल शिंदे, अर्चना साळुंखे, संपदा काळे, श्रुती मरकड, नेताजी घोलप, विजय ढवळे, सुभाष नलावडे यांचे परिश्रम मोलाचे ठरले आहेत. तसेच कर्मचारी वर्गाचे सहकार्य, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा विश्वास याचाही मोठा वाटा आहे. हे ISO प्रमाणपत्र शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी दिशा देणारे ठरेल, असा विश्वास मुख्याध्यापक व शिक्षकांनी व्यक्त केला आहे. भविष्यातही शाळा अशीच प्रगती करत गुणवत्तेचा उच्चांक गाठेल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला.

या यशाबद्दल नगरसेवक निलेश तरस, नगरसेविका ऐश्वर्या तरस, रेश्मा कातळे आणि नगरसेवक धर्मपाल तंतरपाळे यांनी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन केले.